७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. ०१ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com  www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०९६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## गॅस-पेट्रोल तुटवडाही नेहरूंमुळेच झाला : विजय वडेट्टीवार

मुंबई (दै. संध्या) : राज्यातील जनता गॅस सिलिंडरसाठी तासनतास रांगेत उभी आहे. हायवेवरील हॉटेल्स बंद पडली आहेत. काँग्रेस कार्यालयाबाहेरील हॉटेल्सही ओस पडली आहेत. पण सत्ताधाऱ्यांची बनवाबनवी अजूनही सुरूच आहे, अशी टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आज केंद्र व राज्यातील भाजप सरकारवर निशाणा साधताना केली. सध्याची इंधन टंचाई पंडित जवाहरलाल नेहरू किंवा इंदिरा गांधींमुळेच झाली असेल, असा खोचक टोलाही त्यांनी यावेळी भाजपला हाणला. इराण विरुद्ध अमेरिका - इस्त्रायल युद्धामुळे सध्या भारताला होणारा इंधन पुरवठ्यात अडथळा निर्माण झाला आहे. यामुळे देशात सर्वत्र इंधनाचा तुटवडा निर्माण झाला आहे. अनेक शहरांत गॅस एजन्सीपुढे नागरिकांच्या लांबलचक रांगा लागल्याचे दिसून येत आहेत. त्यातच भाजपने या स्थितीसाठी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना जबाबदार धरल्यामुळे काँग्रेसचे पित्त खवळले आहे. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी वरील टीका केली आहे.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज



## एसआयटीचा दबाव वाढला

नाशिक (दै. संध्या) : नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात तपासाला वेग आला असून आजचा दिवस महत्त्वाचा मानला जात आहे. उद्या न्यायालयात खरातला हजर करण्यात येणार असल्याने पोलिस आणि एसआयटीकडून पुरावे गोळा करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. महिलांवरील अत्याचाराच्या आरोपांशी संबंधित अनेक कागदपत्रे आणि साहित्य काल खरातच्या कार्यालयातून जप्त करण्यात आले. या पार्श्वभूमीवर तपास यंत्रणा अधिक आक्रमक झाली आहे. तपासाचा भाग म्हणून खरातचा मोबाईल डेटा पुनर्प्राप्त करून त्यातील चॅटिंग, संपर्क आणि संभाषणांची माहिती तपासली जात आहे. कोणाशी सतत संपर्क होता, कोणते व्यवहार झाले, याचा शोध घेतला जात आहे. या तपासातून आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आज दिवसभरातील तपासाची दिशा उद्या न्यायालयात सादर केली जाणार असल्यामुळे संपूर्ण प्रकरणाकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## राज्यावर पुढील पाच दिवस अस्मानी संकट

मुंबई (दै. संध्या) : गेल्या दोन दिवसांपासून पुणे, नाशिक, धुळे, जळगावसह मराठवाडा आणि विदर्भात अवकाळी पावसाने मोठा हाहाकार माजवला आहे. वादळी वारा आणि गारांच्या कडाक्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून बळीराजाचा हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. मात्र, राज्यावरील हे संकट अद्याप टळलेले नाही. हवामान विभागाने पुढील ५ दिवस राज्याच्या विविध भागांत वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची शक्यता वर्तवली असून काही जिल्ह्यांना 'ऑरेंज' तर काही जिल्ह्यांना 'येलो अलर्ट' जारी केला आहे. पुणे हवामान विभागाचे प्रमुख सुदीप कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात पावसासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. "पुण्यासह संपूर्ण राज्यात पुढील पाच दिवस पावसाचा जोर कायम राहील. विशेषतः दररोज दुपारनंतर वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह गारांचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. ४ एप्रिलनंतरच या पावसाचा जोर ओसरण्याची चिन्हे आहेत," असे त्यांनी स्पष्ट केले.

## बापाचा राग ४ वर्षांच्या मुलावर काढला

मुंबई (दै. संध्या) : पालघर जिल्ह्यातील वसई परिसरातून माणुसकीला काळीमा फासणारी एक अत्यंत संतापजनक आणि क्रूर घटना समोर आली आहे. वडिलांशी असलेल्या जुन्या वादाचा सूड उगवण्यासाठी एका नराधम रिक्षाचालकाने साडेतीन वर्षांच्या निष्पाप बालकाला उचलून जमिनीवर आपटले. या अमानुष मारहाणीत चिमुकला गंभीर जखमी झाला असून, सध्या तो रुग्णालयातील अतिदक्षता विभागात मृत्यूशी झुंज देत आहे.

# अशोक खरातने अजित पवारांवर जादूटोणा केला

### दादांसह महाराष्ट्रातील आणखी एका मोठ्या नेत्याच्या फोटोवर मारल्या फुल्या - रोहित पवार



मुंबई (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मंगळवारी पुन्हा एकदा अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूचा संबंध भोंदू अशोक खरातशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे. भोंदू अशोक खरातकडे फोटोवर फुल्या मारण्याची पद्धत होती. त्यानुसार अजितदादांसह महाराष्ट्रातील एका अत्यंत बड्या नेत्याच्या फोटोवर फुल्या मारण्यात आल्या होत्या. त्यामुळे त्याने कुणाच्या सांगण्यावरून या फोटोंवर फुल्या मारण्याचा जादूटोणा केला? असा सवाल रोहित पवार यांनी यासंबंधी उपस्थित केला आहे.

भोंदू अशोक खरातवर अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. सध्या तो नाशिक पोलिसांच्या कोठडीत आहे. त्याच्यावर नाशिक पोलिसांत तब्बल 10 गुन्हे दाखल करण्यात आलेत. यापैकी 8 गुन्हे लैंगिक शोषणाचे, तर उर्वरित 2 गुन्हे हे आर्थिक फसवणुकीचे आहेत. खरातशी संबंध असल्याच्या कारणावरून सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांना प्रथम राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद व त्यानंतर राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी उपरोक्त आरोप केला आहे.

रोहित पवार यासंबंधी आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाले, जादूटोणासारख्या अंधश्रद्धांना महाराष्ट्र कधीही भीक घालत नाही परंतु जादूटोणा करणाऱ्या कलुषित मनोवृत्तींचा हेतू दुर्लक्षून चालणार नाही. भोंदू अशोक खरात याच्याकडे फोटोवर फुल्या मारण्याची पद्धत होती. त्यानुसार अजितदादा यांच्यासह महाराष्ट्रातल्या एका अत्यंत बड्या नेत्याच्या फोटोवर फुल्या मारण्यात आल्याचं समजतंय. या भोंदू खरातने कुणाच्या सांगण्यावरून फोटोवर फुल्या मारण्याचा जादूटोणा केला? ज्यांच्या सांगण्यावरून जादूटोणा केला त्यांचा हेतू काय होता? हेही समोर येणं गरजेचं आहे. डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या महाराष्ट्रात कर्तृत्वापेक्षा आणि जनतेच्या कामांपेक्षा असल्या भोंदूगिरीवर विश्वास ठेवला जात असेल तर पुढच्या पिढीला काय संदेश जाणार आहे? हे प्रकरण जेवढं भयावह आहे तेवढंच महाराष्ट्राच्या भविष्यालाही घातक आहे. त्यामुळं या भोंदूबाबाच्या माध्यमातून जादूटोणा करणाऱ्या अंधभक्तांचे खरे चेहरे समोर यायलाच हवेत.

दोषींना शिक्षा झालीच पाहिजे, पण सत्य दडपण्यासाठी कोणाचा जीव घेतला जात असेल किंवा सत्य दडपण्यासाठी कोणाला दोषातून वाचवलं जात असेल तर या दोन्ही बाबी योग्य नाहीत. अशी राजकीय रणनीती कुणी आखत असेल तर महाराष्ट्राच्या जनतेला हे अजिबात आवडणार तर नाहीच उलट लोकांचा व्यवस्थेवरचा विश्वास उडेल. सत्य लपवण्यासाठी एवढा अट्टहास का? अशाने सत्य लपणार आहे का? असो, 'कितीही प्रयत्न केला तरी सत्य लपवता येत नाही, ते कधीतरी बाहेर येतंच' याचा अनेकांना विसर पडलेला दिसतोय, असे ते म्हणाले होते.

### अशोक खरातला तुरुंगातच संपवण्याचा डाव

सकाळी रोहित पवार यांनी अशोक खरातला तुरुंगातच संपवण्याचा डाव रचला जात असल्याचा आरोप केला होता. यामुळे राज्याच्या राजकारणात एकच खळबळ माजली होती. ते म्हणाले होते, खूप काही जणांची खूप काही माहिती असलेल्या भोंदू खरातचे धागेदोरे मोठमोठ्या नेत्यांपर्यंत येऊन पोहचल्याने आत्महत्या किंवा इतर काही दाखवून खरातला संपवायचं तर दुसरीकडं अजितदादांच्या अपघाताची इत्तंभूत माहिती असलेल्या व्ही के सिंगला काहीही झालं तरी वाचवायचं अशा चर्चा आहेत.

## तृतीयपंथीय व्यक्तीची स्वत:च्या भावाविरोधात गंभीर तक्रार

मुंबई (दै. संध्या)

मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कथित व्हिडिओ प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. या व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या तृतीयपंथीय व्यक्तीने स्वतःच्या भावाविरोधात गंभीर तक्रार दाखल केली आहे. भावाने ब्लॅकमेल करण्याच्या उद्देशाने वेगवेगळ्या व्हिडिओ क्लिप्स एकत्र करून बनावट व्हिडिओ तयार केला आणि तो सोशल मीडियावर व्हायरल केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या घटनेमुळे प्रकरण अधिक गुंतागुंतीचे बनले आहे. या संदर्भात मुंबईतील कफ परेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, तिच्या



भावाने मुद्दामहून विविध क्लिप्स एडिट करून चुकीचा व्हिडिओ तयार केला. यामुळे तिच्या गोपनीयतेचा भंग झाला असून समाजात बदनामी करण्याचा प्रयत्न झाल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम 79 आणि 351(1) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवला आहे. व्हिडिओची सत्यता तपासण्यासाठी तांत्रिक पातळीवरही चौकशी सुरू करण्यात आली आहे.


## राज्यात १० सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

### अश्विनी भिडे मुंबईच्या नव्या महापालिका आयुक्त; तुकाराम मुंढेंकडे दोन विभागांची धुरा

मुंबई (दै. संध्या)

आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी राज्य सरकारने प्रशासकीय पातळीवर मोठे फेरबदल केले आहेत. १० वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या (IAS) बदल्यांचे आदेश आज (३१ मार्च) जारी करण्यात आले असून, यात अश्विनी भिडे यांची मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदी झालेली नियुक्ती सर्वात महत्त्वाची मानली जात आहे. तर, आपल्या कडक शिस्तीसाठी ओळखले जाणारे तुकाराम मुंढे यांच्याकडे आता 'आपत्ती व्यवस्थापन' या महत्त्वाच्या विभागाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. १९९५ च्या बॅचच्या सनदी अधिकारी आणि मुख्यमंत्र्यांच्या अप्पर मुख्य सचिव





म्हणून कार्यरत असलेल्या अश्विनी भिडे यांची नियुक्ती मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदी करण्यात आली आहे. मुंबई मेट्रो-३ प्रकल्पातील त्यांच्या कामाचा अनुभव आणि प्रशासकीय पकड पाहता, मुंबईच्या विकासकामांना गती देण्यासाठी सरकारने त्यांच्यावर हा मोठा विश्वास टाकला आहे. मुंबईच्या नागरी समस्या आणि पायाभूत सुविधांच्या दृष्टीने त्यांची नियुक्ती महत्त्वाची ठरणार आहे.

२००५ च्या बॅचचे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची बदली दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिवपदावरून 'आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुनर्वसन' आणि वन विभागाच्या सचिवपदी करण्यात आली आहे. सध्या राज्यात सुरू असलेला अवकाळी पावसाचा धुमाकूळ, गारपीट आणि नैसर्गिक आपत्तींचे संकट पाहता, अत्यंत कार्यक्षम आणि धडाडीच्या अधिकाऱ्याची या पदावर गरज होती. मुंढे यांच्या अनुभवाचा फायदा राज्याला येणाऱ्या काळात होणाऱ्या नैसर्गिक आपत्तींच्या नियोजनात मिळेल, अशी चर्चा प्रशासकीय वर्तुळात आहे.


## भारतासह जगभरात इंटरनेट बंद होण्याचा धोका

### युद्धामुळे होर्मुझमध्ये टाकलेल्या केबल्सना नुकसान होण्याची शक्यता; समुद्रात ९७% जागतिक डेटा

नवी दिल्ली (दै. संध्या)

अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धामुळे स्ट्रेट ऑफ होर्मुझ प्रभावित झाल्याने जगभरात ऊर्जा संकटापाठोपाठ आता इंटरनेट ठप्प होण्याचा धोका आहे. याचे कारण असे की, होर्मुझ मार्गातून केवळ जगातील 20% कच्चे तेल आणि 25% LNG जात नाही, तर या मार्गाखाली इंटरनेट केबल्सही टाकलेल्या आहेत.

जर या प्रदेशात तणाव वाढला किंवा केबल्सना नुकसान झाले, तर भारतासह संपूर्ण जगात इंटरनेटचा वेग मंदावू शकतो. तज्ज्ञांचे मत आहे की, हा परिसर केवळ ऊर्जा चोकपॉइंट नाही, तर एक डिजिटल चोकपॉइंट देखील आहे. अनेकदा लोकांना वाटते की, इंटरनेट उपग्रहाद्वारे चालते, पण सत्य वेगळे आहे.



जगातील सुमारे 95 ते 97% डेटा फायबर ऑप्टिक केबल्सद्वारे हस्तांतरित होतो. या केबल्स समुद्राखाली टाकलेल्या असतात. भारताला युरोप, आफ्रिका आणि पश्चिम आशियाशी जोडणाऱ्या मुख्य केबल्स याच मार्गाजवळून जातात. यात SEA-ME-WE, AAE-1 आणि EIG सारख्या मोठ्या केबल सिस्टिम्सचा समावेश आहे.

भारताचे IT आणि आउटसोर्सिंग क्षेत्र सुमारे 250 अब्ज डॉलर (23.48 लाख कोटी) चे आहे. अमेरिकन आणि युरोपीय क्लायंट्ससोबतची रिअल-टाइम कनेक्टिव्हिटी याच कमी-लेटेंसी नेटवर्कवर अवलंबून आहे. केबल तुटल्यास कंपन्यांना मोठे नुकसान होऊ शकते, ज्यामुळे सेवा करार (SLA) तुटण्याची आणि दंड लागण्याची भीती आहे. याव्यतिरिक्त, आखाती देशांकडून येणारे रेमिटन्स (पैसे पाठवणे) आणि SWIFT सारखे बँकिंग व्यवहार देखील स्लो होऊ शकतात.

### भारतासाठी मोठा धोका का आहे?

भारताची डिजिटल अर्थव्यवस्था बऱ्याच अंशी या सागरी मार्गांवर अवलंबून आहे. भारताची बहुतेक आंतरराष्ट्रीय इंटरनेट बँडविड्थ अरबी समुद्र आणि आखाती प्रदेशातून येते.

लेटेंसी वाढेल: केबल्सचे नुकसान झाल्यास, ट्रॅफिकला लांबच्या 'पॅसिफिक मार्गावर' वळवावे लागेल. यामुळे लेटेंसी म्हणजेच डेटा प्रवासाचा वेळ वाढेल.

इंटरनेट स्लो होईल: यूट्यूब, इंस्टाग्राम आणि नेटफ्लिक्ससारख्या प्लॅटफॉर्मवर बफरिंग वाढेल. व्हिडिओ कॉल आणि क्लाउड सेवांमध्ये विलंब होईल.

## राष्ट्रवादीत मोठा बदल; ओबीसी-अल्पसंख्याक सेल गायब

मुंबई (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नव्या संविधानावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. पक्षाचा कणा मानले जाणारे ओबीसी, अल्पसंख्याक आणि सामाजिक सेल नव्या रचनेतून वगळण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. यापूर्वी पक्षाच्या संविधानात सात फ्रंटल सेलचा समावेश होता, मात्र आता केवळ चारच सेल ठेवण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. या बदलांमुळे पक्षाच्या संघटनात्मक धोरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नव्या संविधानात युवक, विद्यार्थी, महिला आणि सेवादल या चारच सेलचा समावेश करण्यात आल्याचे समोर आले आहे. 28 फेब्रुवारी रोजी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष



■ नव्या रचनेवर गंभीर प्रश्न;संविधान बदलांवरून रोहित पवारांची टीका

निवडीच्या वेळी निवडणूक आयोगाला पाठवलेल्या कागदपत्रांमध्ये या बदलांचा उल्लेख असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या बदलांची अधिकृत नोंद झाली असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर पक्षाच्या अंतर्गत निर्णयप्रक्रियेवरही चर्चा सुरू झाली आहे.

## मराठा इतिहासाची मोडतोड करण्याचे षडयंत्र सुरू : इंद्रजीत सावंतांची प्रतिक्रिया

मुंबई (दै. संध्या)

जैन मुनी आचार्य नयन पद्मसागर यांनी महाराणी ताराराणी यांच्याबद्दल केलेल्या एका विधानामुळे महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. "औरंगजेबाचा नाश करण्यासाठी जैन महाराणी असलेल्या ताराराणींचा जन्म झाला," असे विधान आचार्य नयन पद्मसागर यांनी मुंबईतील एका कार्यक्रमात केले. या विधानावर इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांनी संताप व्यक्त केला असून, हे विधान ऐतिहासिक तथ्यांची मोडतोड करणारे असल्याचे म्हटले आहे. मुंबईत आयोजित जैन समुदायाच्या एका कार्यक्रमात बोलताना आचार्य नयन पद्मसागर यांनी महाराणी ताराराणी या जैन समुदायाच्या होत्या, असा दावा केला. त्यांच्या या विधानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच इतिहासप्रेमी आणि अभ्यासकांकडून त्यावर आक्षेप घेण्यात येत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या इतिहासात ताराराणींचे योगदान अतुलनीय आहे, मात्र त्यांना एका विशिष्ट धर्माच्या चौकटीत मांडल्याने हा वाद निर्माण झाला आहे. महाराणी ताराराणी या शककर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्नुषा आहेत. स्वराज्याचे पहिले सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या त्या कन्या आहेत. शिवपुत्र राजाराम महाराज यांच्या त्या पत्नी आहेत.




ताराराणी साहेब या मराठा आहेत. याबद्दल कोणाचेही दुमत असता कामा नये. कारण या संदर्भात शेकडो पुरावे उपलब्ध असल्याचे इंद्रजीत सावंत म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती ताराराणी महाराज या आपल्याच समाजात जन्माला याव्यात असे जगातल्या सर्वच लोकांना वाटते. मात्र असं असलं तरी देखील त्यांच्याबद्दल वक्तव्य करत असताना इतिहासाची माहिती घेणे तितकेच गरजेचे आहे, असे इंद्रजीत सावंत म्हणाले. सध्या एका जैन मुनि यांनी ताराराणी या जैन असल्याचे वक्तव्य केले आहे. जो जैन समाज शांततेसाठी आणि अहिंसेसाठी ओळखला जातो. त्या समाजातील प्रमुखांनी असे वक्तव्य करून समाजामध्ये तेढ निर्माण करू नये. मराठा इतिहासाची मोडतोड करण्याचे एक षडयंत्र सुरू आहे. या षडयंत्रचा एक भाग या आचार्य मुनीनी होऊ नये असे मला वाटते. महाराष्ट्र अशा पद्धतीचे वक्तव्य कधीही सहन करणार नाही त्यामुळे या आचार्यांने हे समजून घेतले पाहिजे, असेही इंद्रजीत सावंत म्हणाले. महावीर जयंतीच्या निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना आचार्य नयन पद्मसगर म्हणाले, मोहम्मद घोरीने देशावर आक्रमण केले त्यावेळी जैन असलेल्या मेवाड राणीने आपली तलवार काढली. त्यानंतर पुढील अनेक वर्षे आपल्या देशावर कोणी नजर वर करून बघायची हिंमत केली नाही. संस्कार आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी हातात तलवार घेणे याला धर्म म्हणतात. विक्रमादित्यने पूर्ण भारताला स्वतंत्र करण्यात मदत केली. औरंगजेब याने संभाजी महाराजांना पकडून हाल केले. त्यावेळी आणखी एक जैन महाराणीचा जन्म झाला आणि ती म्हणजे ताराराणी, असे विधान पद्मसागर यांनी केले आहे.

## संपादकीय

# कायदा झाला, अंमलबजावणीचे काय?

पुरोगामी महाराष्ट्रात अंधश्रद्धेविरोधातील कायदा करण्यासाठी प्रदीर्घ संघर्ष चालला. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या आंदोलनातून या कायद्याची पायाभरणी झाली. सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाने वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यावर भर देत आपल्या निकालांतून अशा कायद्यांना घटनात्मक आधार दिला आहे. घटनेतील अनुच्छेद ५१३अ (h) अंतर्गत वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे हे नागरिकांचे कर्तव्य असल्याचे न्यायालयांनी अधोरेखित केले आहे. महाराष्ट्रात जादूटोणाविरोधी कायद्याची मागणी १९८९ पासून होत होती. २००३ मध्ये यासंदर्भातील विधेयकाचा पहिला मसुदा तयार करण्यात आला. मात्र, धार्मिक व सामाजिक विरोधामुळे हे विधेयक वारंवार स्थगित झाले, समित्यांकडे पाठवले गेले आणि त्यावर निर्णय लांबणीवर पडत गेला.

२० ऑगस्ट २०१३ ला डॉ. दाभोलकर यांच्या हत्येनंतर राज्यभर तीव्र प्रतिक्रिया उमटली. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने तातडीने २२ ऑगस्ट रोजी अध्यादेश जारी केला. नंतर डिसेंबर महिन्यात विधिमंडळाची मंजुरी मिळून 'महाराष्ट्र मानव बळी आणि इतर अमानवी, अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक व निर्मूलन अधिनियम, २०१३' लागू झाला. यात अंधश्रद्धेच्या नावाखाली फसवणूक, भूत प्रेत काढणे, जादूटोणा करून उपचार, मानसिक/शारीरिक छळ, मानवी बळी, भीती दाखवून पैसे उकळणे हे अपराध आहेत. या कायद्यात लैंगिक शोषणाला अत्यंत गंभीर गुन्हा मानले आहे. 'देव खुश होतील', 'भूतबाधा निघेल' किंवा 'संतानप्राप्ती होईल' अशा कारणांनी महिला किंवा व्यक्तीचे लैंगिक शोषण करणे, 'उपचार' किंवा 'शुद्धीकरण'च्या नावाखाली अश्लील किंवा लैंगिक शोषण कायद्यानुसार गुन्हा आहे. या कायद्याच्या कलम ११ नुसार अंमलबजावणीसाठी नियम तयार करण्याची तरतूद असूनही शासनाने सविस्तर नियम अद्याप बनवलेलेच नाहीत. ही जबाबदारी सरकारने बार्टीकडे सोपवली होती. बार्टीने नियमाचे प्रारूप शासनाला २०१६ मध्ये सादर केले. त्याला अद्याप मान्यता मिळालेली नाही.

प्रचार-प्रसार व जनजागृतीच्या विभागीय व जिल्हास्तरीय समितीमध्ये ७-७ अशासकीय सदस्यांना नेमण्याचे आदेश शासनाने २०१४ मध्ये जारी केले, मात्र या नेमणुका झालेल्या नाहीत. अशासकीय समितीच्या नेमणुकीसाठीही राज्यभरात एकसूत्रीपणाचे धोरण नाही. २०२४ मध्ये सामाजिक न्यायमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली 'क्रियान्वय समिती'चे गठन करण्यात आले. या समितीवर सरकार या विषयात प्रत्यक्ष काम करणाऱ्यांची नेमणूक करेल, अशी किमान अपेक्षा आहे. पोलिस विभागाने १९ जून २०२४ रोजी आयुक्तालय व जिल्ह्यात गुन्हे शाखेच्या सहायक आयुक्त व निरीक्षकांना दक्षता अधिकारी म्हणून नेमले तसेच प्रत्येक पोलिस ठाण्यात अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष तयार करण्याचे आदेश देऊन कागदी कारवाई पूर्ण केली. मात्र, पोलिस बहुतांश वेळा तक्रार आल्यावरच गुन्हे नोंदवतात. या प्रकरणांमध्ये सामाजिक भीतीमुळे पीडित पुढे येत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. पोलिस विभागाने या कायद्यांतर्गत गुन्ह्याचा प्रतिबंध व तपास कसा करावा, यासाठी कुठलेच प्रशिक्षण आयोजित केलेले नाही. पोलिस महासंचालक कार्यालयात या कायद्यांतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्यांची एकत्रित माहिती उपलब्ध नाही. राज्य गुन्हे शाखेत सांख्यिकी कक्ष आहे. मात्र, माहिती अधिकार कायद्यात माहिती मागणाऱ्याला प्रत्येक जिल्ह्यातून माहिती घ्यावी, असे उत्तर देण्यात येते. पुढे अनेक जिल्हा अधीक्षक प्रत्येक पोलिस ठाण्याशी संपर्क साधायला सांगतात, असा अर्जदारांचा अनुभव आहे. एकूणच या विषयात पोलिस यंत्रणेची अनास्थाच प्रकर्षाने दिसते. 'अंनिस'च्या मते राज्यात या कायद्यांतर्गत जवळपास अडीच हजार गुन्हे दाखल असावेत. सुमारे ३० गुन्ह्यांमध्ये कोर्टात निकाल लागले आहेत. यात शिक्षा होण्याचे प्रमाण लक्षणीय आहे. पण त्याचे खरे श्रेय सरकारपेक्षा अंनिसच्या पाठपुराव्यालाच आहे.

## संस्कृत सुभाषित

आत्मानमेव मन्येत कर्तारं सुखदु:खयो:।
तस्माच्छ्रेयस्करं मार्ग प्रतिपद्येत् न त्रसेत्।।
अर्थ : आरोग्य आणि आजार, सुख आणि दु:ख यांचे निर्माते आपणच असतो. म्हणून इष्ट व श्रेयस्कर मार्गच नेहमी स्वीकारावा म्हणजे त्रास होत नाही.

## गुरु वचन


### कर्मयोगासाठी कौशल्य असणे आवश्यक

माणसाला त्याने केलेल्या कर्मानुसार फळ मिळत असते. परंतु बऱ्याजणांची तक्रार असते की, आपण दिवसभर राबूनही कसेबसे पोटापुरते मिळते, तर तेच काम करणारा आपला शेजारी मात्र सुखात असतो. तसेच तो काम केल्यानंतर समाधानीही दिसतो. गीतेत भगवंतानेही म्हटले आहे की कर्मयोग याचा अर्थ कौशल्याने वा शास्त्रीय पध्दतीने काम करणे. कर्मानुष्टानाचा विधी व्यवस्थित समजून घेतल्यासच माणसाला उत्तम फळ मिळू शकते. सर्व कर्मांचा उद्देश मनामध्ये पूर्वीपासून असलेली शक्ती प्रकट करणे व आत्मा जागृती करणे, प्रत्येक माणसामध्ये पूर्ण ज्ञान व पूर्ण शक्ती असते. निरनिराळी कर्मे या महान शक्ती जागृत करण्याचे व प्रकट करण्याचे फक्त साधन आहे. या साधनाचा आपण किती कौशल्याने वापर करतो यावर त्याचे फळ अवलंबून असते.

## सुविचार

हे विश्व मनुष्याला तत्त्वचिंतन करता यावं या उद्देशाने अस्तित्वात आहे.
– केदार जोशी

## उपदेशकथा



### हुशार टोळ

एक टोळ उंच झाडावर बसून आनंदाने किरकिर आवाज करीत बसला होता. एका कोल्ह्याने त्याला पाहिले आणि त्याला खाऊन टाकण्याकरिता त्याने एक बेत आखला. कोल्हा झाडाखाली उभा राहून म्हणाला, 'काय सुंदर आवाज आहे रे तुझा? पण जरा खाली येतोस का? तुझा आवाज तर चांगला मोठा पल्लेदार आहे. पण तू आहेस तरी केवढा? मला मोठे कुतूहल वाटतंय.

पण तो टोळ कोल्ह्याच्या युक्तीला फशी पडला नाही. त्याने झाडाचे एक पान तोडले आणि ते खाली टाकले. कोल्ह्याला वाटले, टोळच खाली पडला. एवढ्यात टोळ म्हणाला, 'तुला काय वाटलं मीच खाली आलो म्हणून! पण एक गोष्ट लक्षात ठेव, मी एकदा कोल्ह्याच्या विष्ठेत टोळाचे पंख पाहिले होते. तेव्हापासून कोल्हा दिसला की मी सावधगिरीने वागतो.'

कथा उपदेश : सावधगिरी हाच शहाणपणा.



## पंचांग

| | |
|---|---|
| १ एप्रिल २०२६ | करण:वणिज ०७:०६:२९ |
| बुधवार | करण:विष्टि १९:२०:५६ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:मीन |
| चैत्रशके संवत्– १९४८ | चन्द्र:कन्या |
| संवत्सर –पराभवनाम | हिजरी सन् – १४४५ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – शव्वाल |
| मास– चैत्र | तारीख – १२ |
| ऋतु– सौर वसंत | विशेष |
| शुक्ल पक्ष | हनुमान जन्मोत्सव उपवास |
| तिथि:चतुर्दशी ०७:०६:२९ | ज्योतिर्लिंग |
| नक्षत्र:उत्तरा चैत्री १६:१७:१४ | यात्रा– कोल्हापूर |
| योग:वृद्धि १४:५०:१२ | सत्यदेव महाराज जयंती – नवी भारवाडी (अमरावती) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | | 3 | | | 7 | | 5 |
| 5 | 6 | | | 1 | | 2 | | 9 |
| | | | | | | | 6 | |
| 4 | 3 | | | 2 | | | | 7 |
| 1 | | 8 | 9 | | 4 | 5 | | 6 |
| 6 | | | | 8 | | | 3 | 1 |
| | 8 | | | | | | | |
| 3 | | 7 | | 4 | | | 1 | 2 |
| 9 | | 4 | | | 3 | | 5 | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १०३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | 1 | 3 | 6 | 9 | 7 | 4 | 5 |
| 5 | 6 | 3 | 4 | 1 | 7 | 2 | 8 | 9 |
| 7 | 4 | 9 | 8 | 5 | 2 | 1 | 6 | 3 |
| 4 | 3 | 5 | 1 | 2 | 6 | 8 | 9 | 7 |
| 1 | 7 | 8 | 9 | 3 | 4 | 5 | 2 | 6 |
| 6 | 9 | 2 | 7 | 8 | 5 | 4 | 3 | 1 |
| 2 | 8 | 6 | 5 | 9 | 1 | 3 | 7 | 4 |
| 3 | 5 | 7 | 6 | 4 | 8 | 9 | 1 | 2 |
| 9 | 1 | 4 | 2 | 7 | 3 | 6 | 5 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ५२७ – बायझेन्टाईन सम्राट जस्टीन पहिला याने स्वत–चा भाचा जस्टीनीयन पहिला यास आपला वारसदार घोषित केले.
- २००४ – गूगलने जीमेल ही ई–पत्र प्रणाली सुरू केली.
- २००६ – ब्राझिलमधील रियो दि जेनेरियोजवळ एका विमान अपघातात १९ प्रवासी ठार झाले.
- २००८ – मॅक्सिकोची लिटल ओल्ड लेडी किलर नावाने कुख्यात माजी महिला पैलवानास ११ वयोवृद्ध महिलांची हत्या करण्याच्या आरोपात ७५९ वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली.

### राष्ट्रीय

- १९३५ – भारतीय रिझर्व बँकेची स्थापना.
- २००८ – निठारी हत्याकांड प्रकरणातील संशयित आरोपी आणि लाल कोठीचा मालक असलेल्या मोनिंदर पंधेर याला सीबीआयने पुन्हा एकदा क्लिनचीट दिली.
- २००८ – १९९२ मधील शेअर घोटाळ्याप्रकरणी शेअर दलाल केतन पारेख आणि हितेन दलालसह आणखी पाचजणांना मुंबई उच्च न्यायालयाने एक वर्षाच्या कारावासाची शिक्षा सुनावली. याच प्रकरणात अन्य दोघांना उच्च न्यायालयाने सहा महिन्यांची शिक्षा दिली.

### जन्म

- १२२० – गो–सागा, जपानी सम्राट यांचा जन्म.
- १८८९ – राष्ट्रीय स्वंयसेवक संघ (आरएसएस)चे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचा जन्म.

### निधन

- १०८५ – शेन्झाँग, चीनी सम्राट यांचे निधन.
- १२०४ – एक्विटेनची एलिनोर, इंग्लंडचा राजा हेन्री दुसरा याची पत्नीचे निधन.

## : SMS :

Kissing at TOP....
Fingering at MIDDLE...
Firing at bottom ...
Yes your right "CIGARETTE"
'Smoking is injurious to health'

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३४.८ | २३ |
| अहमदनगर | ३५.२ | २२.६ |
| अकोला | ३९.२ | २४.९ |
| अमरावती | ३८.२ | २५.२ |
| बीड | ४०.८ | २६.८ |
| भंडारा | ४०.४ | २६.२ |
| बुलढाणा | ३२.९ | २१.१ |
| चंद्रपूर | ४१.१ | २७.२ |
| चेन्नई | ३८.९ | २७.५ |
| नवी दिल्ली | ३०.७ | २२.५ |
| धुळे | ३७.५ | २४.३ |
| गोंदिया | ३८.८ | २६.१ |
| जळगाव | ३९ | २४.८ |
| कोल्हापूर | ३५.३ | २१.६ |
| लातूर | ३५.९ | २४ |
| मुंबई | ३७.५ | २९.३ |
| नागपूर | ३९.५ | २६ |
| नांदेड | ३८.९ | २४.५ |
| नंदूरबार | ३५.४ | २३.६ |
| नाशिक | ३४.६ | २०.५ |
| पुणे | ३४.२ | २०.१ |
| पंढरपूर | ३८.४ | २५.२ |
| सातारा | ३५.२ | २०.४ |
| सांगली | ३६.१ | २३.३ |
| सोलापूर | ३८.३ | २५.६ |
| वर्धा | ४० | २५.६ |



## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: उत्तर आपण हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण राग आणि बोलण्यावर नियंत्रण ठेवा. विवेकबुद्धीने काम करणे फायदेशीर ठरणार आहे.

**मिथुन :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पश्चिम कामकाजात आलेली समस्या आपल्या प्रयत्नामुळे दूर होईल. कामकाजावर विशेष लक्ष द्या.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: उत्तर स्वत: घेतलेल्या निर्णयावर अटळ राहिल्याने आपल्याला अनकुल असे परिणाम दिसून येतील.

**सिंह :** शुभ रंग :निळा, शुभ दिशा: दक्षिण आई वडिलांची काळजी दूर होईल. आपला दयाळू स्वभाव आपल्याला आनंद देईल.

**कन्या :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:उत्तर आयुष्यातील जोडीदाराकडून आपणास अनकूल असे सहकार्य लाभणार आहे.

**तुळ :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:दक्षिण जास्त उत्साह दाखवल्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम मित्र आणि शुभचिंतक यांच्या मार्गदर्शनामुळे समस्या दूर होण्यास मदत होईल.


**धनु :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम उद्योग व्यवसायात मनासारखे यश मिळण्याचे योग आहेत. स्पर्धात्मक परिक्षेत भाग घ्यावा.

**मकर :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पश्चिम मुलांची काळजी दूर होईल. वाद विवाद, तणाव टाळा, शुभकार्याच्या योजनेमुळे आपले जीवन आनंदमयी होईल.

**कुंभ :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: पश्चिम वातावरण चांगले असल्यामुळे योजना आखाल. योजना भविष्याच्या दृष्टीने फायदेशीर ठरणार आहेत.

**मीन :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: उत्तर अचानक धन लाभ होण्याचा योग आहेत. प्रतिष्ठित व्यक्तिंची गाठभेट होण्याची शक्यता आहे.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०४



### आडवे शब्द

१. कृष्णाचा मित्र
६. जवळपास, सभोवती
९. ढीग
११. प्रत्येक वर्षी
१३. रस्ता
१४. देशातील किंवा राज्यातील प्रमुख शहर
१६. दृष्टिभेट
१९. पूर्ण भरतीची वेळ
२०. नवा
२२. पृथ्वी
२३. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नसणे
२६. प्रत्येक दिवशी, मजुरी
२७. जास्त
२९. लता, वेल
३०. टिंगल
३१. बोटाच्या टोकावर असते ते
३२. खरेदी
३४. जुने, ऐतिहासिक लेखन
३६. वटवट
३८. जबरदस्तीने (हिंदी)
४०. चेहऱ्याची निमुळती बाजू
४२. ज्वारीची रोटी
४४. माल
४५. हिंदीत कालवा
४६. भाकरी–पोळीचा पाव भाग
४८. अपऱ्या नाकाची
५०. बांबू
५२. आंब्याची पोळी
५४. मांडणी
५६. हिशोबात केलेला गोंधळ
५७. चक्र
५८. रामाचा एक भाऊ
५९. वजनदार
६०. व्यापारी
६१. राजकारणातील पवार, जोशी या मान्यवरांचे नाव
६२. अनुकंपा, करूणा
६३. स्तुतीस्तोत्र
६५. भांडण
६७. मागचे अंगण
६९. प्रत्यक्षात
७१. आशीर्वाद, वर
७३. परंपरागत गण वा संपत्ती
७४. शेत
७५. कावळा
७६. जनन
७७. बळी जाणारा
७८. काळ्या पाठीचे हरीण
७९. उत्तराधिकारी
८०. ताक कुंफ्कून पिणारा
८१. मल्याळी भाषिक राज्य

### उभे शब्द

१. श्रीकृष्णाचे आयुध
२. दरवाजा
३. मत्स्य
४. आटोपते घेणे, आवरणे
५. जोरजबरदस्ती
६. कुंभाराची भट्टी, स्त्री
७. काचेचे पात्र
८. मध्यम प्रमाण
९. कृष्णसखी
१०. सुनील गावस्करलिखित एक पुस्तक
१२. नम्र
१५. शिल्लक
१७. असे असल्यास
१८. धूळ
२१. फायदा
२४. नाजूकपणा नसलेले, भडक
२५. प्रौढ, जून
२६. थेट, स्पष्ट
२८. ताणले जाणारे
३३. निमंत्रक, कुटुंबप्रमुख
३५. खणणे
३७. माळी, बागवान
४०. अडथळा, प्रश्न
४१. दरारा
४२. नशीब
४३. घोड्यावरून फेरी
४७. काटेरी औषधी वनस्पती
४९. अगदी थोडे
५१. नम्रपणे झुकलेला
५२. उंट हाकणारा
५३. अकस्मात
५५. त्रैलोक्यात फिरणारा मुनी
५६. महासर्प
५९. संधी
६१. नगर
६२. डुक्कर, ऱ्हस्व उच्चाराने खेकडा
६४. सततची हालचाल
६६. पटकन
६८. रामदासांचा ग्रंथ
६९. बैलांचा सण, बेंदूर
७०. दरवाज्यावरचा आवाज
७२. दृष्टी
७४. माठ, गाडगे
७५. कारस्थान
७८. मृत्यू

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. १०३ चे उत्तर

आडवे उत्तर : १.मोगल ३.सोमवती ६.मग ८.सदा ११.ताजमहाल १३.मजलदरमजल १६.लीन १८.यमुना २०.बरका २१.नाक २२.गरम २५.मतदार २६.बाट २७.करवट २८.कलमदान २९.ताई ३०.मना ३१.स्वीय ३४.वरवर ३७.करतल ४१.दामोदर ४४.तमा ४५.जळवात ४६.जर ४७.शूर ४८.वचनावचनी ५०.पाणी ५१.सराफ ५२.नार ५३.काळ ५४.शर ५६.पडदा ५७.खरवस ५८.समक्ष ६०.रविवासर ६३.कर्तन ६४.उदास ६६.सरण ६७.नद ६९.मदार ७०.वजीर ७१.वाणी ७२.रट्टा ७३.शरद ७४.भोकर ७५.पारोसा ७६.आरमार ७७.सापळा ८०.दुवा ८१.लक्ष ८२.मस्त ८३.पापणी

उभे उत्तर : १.मोगली २.लता ३.सोम ४.महा ५.वलय ६.मज ७.गलबत ८.सरकार ९.दाम १०.हलकट १२.जळमट १३.मना १४.दरदाम १५.जनाबाई १७.नगर १९.मुक्काम २३.रवरव २४.हकनाक २५.मनस्वी २७.करवत २९.ताठर ३२.यदा ३३.सटरफटर ३५.रमावर ३६.रचनाकार ३८.रजनीश ३९.तळ ४०.लवाद ४२.मोजणीदार ४३.दर ४७.शूरा ४९.वळवळ ५०.पाड ५१.सकवार ५२.नामकरण ५५.रसदार ५६.पक्ष ५७.खनन ५९.मस ६१.विसरभोळा ६२.सणवार ६४.उदाहरण ६५.अवदसा ६८.दरसाल ७३.शरम ७५.पावा ७८.पसा ७९.राणी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ‘शौकीन फॅमिली पान’ खेड शिवापूरमध्ये; 50 हून अधिक चवींची आकर्षक मेजवानी

पुणे (दैनिक संध्या) : पुण्याच्या समृद्ध खाद्यसंस्कृतीत वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या ‘शौकीन फॅमिली पान’ या उपक्रमाने विस्ताराच्या नव्या टप्प्यात प्रवेश केला आहे. शहरातील नळ स्टॉप येथून सुरू झालेल्या या लोकप्रिय पान उपक्रमाची २८ मार्च २०२६ रोजी खेड शिवापूर येथे नव्या शाखेच्या उद्घाटनाने भर पडली आहे. पुणे–बंगळूर महामार्गावरील हॉटेल जगदंबा परिसरात ही शाखा सुरू करण्यात आली आहे. ‘शौकीन पान’चे वैशिष्ट्य म्हणजे येथे उपलब्ध असलेली सर्व पाने शंभर टक्के तंबाखूमुक्त असून ती नैसर्गिक घटकांपासून तयार केली जातात. त्यामुळे आरोग्यदायी व सुरक्षित पर्याय म्हणून ग्राहकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. या ठिकाणी पारंपरिक विड्यांसह ‘फायर पान’, ‘चॉकलेट पान’ आणि ‘गोल्ड लीफ पान’ अशा ५० हून अधिक विविध चवींची मेजवानी उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, पुण्यातील पहिले ‘फॅमिली पान शॉप’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या उपक्रमात महिलांसाठी व लहान मुलांसाठी स्वच्छ, सुरक्षित आणि आनंददायी वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे. सध्या पुण्यात कोथरूड, बाणेर, हडपसर, वाकड, सिंहगड रस्ता, बावधन तसेच पिंपरी-चिंचवड परिसरात या पान उपक्रमाच्या शाखा कार्यरत आहेत. याशिवाय मुंबईतील दादर येथेही या उपक्रमाने यशस्वी पाऊल ठेवले आहे. सन २००५ मध्ये उद्योजक शरद मोरे यांनी सुरू केलेल्या या उपक्रमाने पारंपरिक पानाला ‘मिष्टान्न पान’ अशी नवी ओळख दिली आहे. बदलत्या ग्राहकांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन ‘शौकीन पान’ आता ऑनलाईन माध्यमावरही उपलब्ध असून ग्राहकांना घरपोच सेवेद्वारे या विशेष पानांचा आस्वाद घेता येत आहे. खेड शिवापूरमधील नव्या शाखेमुळे ‘शौकीन फॅमिली पान’चा विस्तार अधिक बळकट झाला असून भविष्यात महाराष्ट्रासह देशभरात विस्तार करण्याचा मानस व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.

### 509 चौक ते धानोरी डीपी रस्त्याच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी



पुणे (दैनिक संध्या) : ५०९ चौक ते धानोरी येथील प्रस्तावित डीपी रस्त्याच्या मार्गाची आज सकाळी मा. आमदार सुनिलआण्णा टिंगरे यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान रस्त्याच्या कामासंदर्भातील प्रगती, अडचणी व पुढील कार्यवाही यांचा सखोल आढावा घेण्यात आला. यावेळी मा. आमदार सुनिलआण्णा टिंगरे यांनी मार्गदर्शन करत रस्त्याचे काम लवकर पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यापूर्वी या रस्त्याबाबत पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यानुसार आज प्रत्यक्ष पाहणी करताना कामात येणाऱ्या अडथळ्यांवर, जागा ताब्यात घेण्याच्या प्रक्रियेतील अडचणींवर तसेच विविध प्रशासकीय मुद्द्यांवर अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी पुणे महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता संजय धारव, उपअभियंता प्रशांत मोरे, उपअभियंता पौर्णिमा गायकवाड, कनिष्ठ अभियंता सुशिल मोहिते, सुनिल पोहोफळे, अक्षय मोडवे तसेच श्री. निजानंद खामकर आदी उपस्थित होते. सदर रस्ता हा नागरिकांच्या दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा असून, त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करून नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी, अशा स्पष्ट सूचना यावेळी देण्यात आल्या.

### कोरेगाव पार्कमधील संशयास्पद जमीन व्यवहारावर प्रकरणी SIT चौकशीची मागणी

पुणे (दैनिक संध्या) : कोरेगाव पार्क परिसरातील बहुमूल्य जमीन व्यवहारात गंभीर अनियमितता, काळा पैसा आणि बेनामी गुंतवणुकीचा संशय व्यक्त करत मुख्यमंत्री यांच्याकडे विशेष तपास पथक (SIT) मार्फत चौकशीची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात कथित बोगस बाबा अशोक खरात याचा सहकारी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सीए प्रकाश पोफळे यांचे नाव पुढे आले आहे. तक्रारीनुसार, अशोक खरात हा मागील २५ वर्षांपासून लोकांची फसवणूक करत असून त्याने अवैध मार्गाने कमावलेला मोठा काळा पैसा विविध व्यवसायांमध्ये गुंतवून पांढरा करण्याचा आरोप आहे. या प्रक्रियेत पुण्यातील चार्टर्ड अकाउंटंट प्रकाश पोफळे यांची महत्त्वाची भूमिका असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. कोरेगाव पार्क येथील सुमारे ५० गुंठे जमीन आणि त्यावरील रो-हाऊसेस संदर्भातील व्यवहारात अनेक कायदेशीर त्रुटी आढळल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# माहेश्वरी प्रीमियर लीगचे चार एप्रिलपासून आयोजन

**दीड लाख रुपयांची पारितोषिके, नेहरू स्टेडियमवर रंगणार स्पर्धा**



पुणे (दै. संध्या) :

पुणे जिल्हा माहेश्वरी प्रगती मंडळ (जिल्हा युवा समिती) यांच्या वतीने पुणे जिल्हा माहेश्वरी प्रीमियर लीग (पीएमपीएल) या व्हाईट लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ४ ते १२ एप्रिल २०२६ दरम्यान स्वारगेट येथील पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियम येथे होईल. स्पर्धेत एकूण दीड लाख रुपयांची पारितोषिके असणार आहेत, अशी माहिती क्रीडा अध्यक्ष नीरज धूत यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

या वेळी युवा अध्यक्ष रोनक झंवर, युवा सचिव मनीष मणियार, क्रीडा सचिव गितेश झंवर, कोषाध्यक्ष हिमांशू सोनी यांच्यासह अभय करवा, संतोष जाजू, कृष्णा राठी आणि शुभम मंत्री हे पदाधिकारी उपस्थित होते. रोनक झंवर म्हणाले, या स्पर्धेत सहा संघ सहभागी होत असून, एकूण १९ सामने खेळवले जाणार आहेत. त्यापैकी १२ सामने लीग टप्प्यात होतील. लीगचे सामने १२ षटकांचे होणार आहेत. उपांत्य फेरी ११ एप्रिल रोजी (१६ षटकांचे सामने) होणार असून, १२ एप्रिल रोजी तिसऱ्या क्रमांकाची लढत आणि अंतिम सामना पार पडणार आहे. स्पर्धेत हाय-बाइट चॅलेंजर्स, मोल्डर्स, प्रारव पँथर्स, सारडा स्टॅलियन, साईज मास्टर्स स्मॅशर्स आणि स्मॅशर योद्धाज हे संघ सहभागी होणार आहेत. स्पर्धेच्या लढती सकाळी नऊ ते दुपारी साडेचारपर्यंत रंगणार आहेत. विजेत्या संघाला रुपये ७१ हजार आणि उपविजेत्या संघाला रुपये ४१ हजार देऊन गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबर स्पर्धेत सर्वोत्कृष्ट फलंदाज, सर्वोत्कृष्ट गोलंदाज, सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक अशी इतर पारितोषिकेही दिली जाणार आहेत.

स्पर्धेसाठी बेहडे बिल्डकॉन एलएलपी निशांत बेहडे व परिवार हे मुख्य प्रायोजक असून, त्यांनी सलग दुसऱ्या वर्षी स्पर्धेला पाठिंबा दिला आहे. मेटारोल श्रीमती राधिका बिर्ला हे को-टायटल स्पॉन्सर आहेत. बुलडाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. हे व्हेन्यू स्पॉन्सर, जीबी ग्रुप गणेश भुतडा ट्रॉफी स्पॉन्सर, तर मॅजेस्टिक लँडमार्क कैलाश मुंदडा जर्सी स्पॉन्सर म्हणून सहभागी आहेत. याशिवाय डीडब्ल्यू रिअल्टर्स अँड लॉ फर्म, स्वनिती, तिरुपती सेल्स एम्पोरियम आणि अरुणकुमार अँड कंपनी हे असोसिएट स्पॉन्सर्स म्हणून सहभागी झाले आहेत.

दरम्यान, टायटल स्पॉन्सर बेहडे बिल्डकॉन एलएलपी यांनी सलग दुसऱ्या वर्षी दिलेल्या पाठिंब्यामुळे यंदाची पीएमपीएल स्पर्धा अधिक भव्य, उत्कृष्ट आणि दमदार होणार आहे.

## भगवान महावीर स्वामींच्या जन्म कल्याणकानिमित्त पुण्यात भव्य शोभायात्रा

पुणे (दै. संध्या) :

“त्रिशला नंदन वीर की... जय बोलो महावीर की” या जयघोषात पुण्यात तीर्थंकर भगवान महावीर स्वामी यांच्या २६२५व्या जन्म कल्याणक महोत्सवानिमित्त भव्य शोभायात्रा काढण्यात आली. श्री जैन सामुदायिक उत्सव समितीच्या वतीने आयोजित या शोभायात्रेत जैन बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. गुरुवार पेठेतील श्री गोडीजी पार्श्वनाथ जैन मंदिर येथून सकाळी साडेसात वाजता शोभायात्रेला प्रारंभ झाला. मंगलवाद्यांच्या सुरावटीत आणि ढोल-ताशांच्या गजरात भगवान महावीर यांच्या प्रतिमेचा चांदीचा रथ मिरवणुकीच्या अग्रभागी होता. फुलांच्या आकर्षक सजावटीने सजलेले एकूण २० रथ या शोभायात्रेत सहभागी झाले होते.



शोभायात्रेत भगवान महावीर यांच्या जीवनावर आधारित विविध देखावे सादर करण्यात आले. त्यांच्या अहिंसा, सत्य आणि करुणा या जीवनमूल्यांचे प्रभावी दर्शन घडवण्यात आले. पारंपरिक वाद्यांच्या तालावर श्री क्षत्रिय घाँची समाज ट्रस्टच्या सदस्यांनी फेर धरत जयघोष केला. तसेच लाठ्या-काठ्या आणि दांडपट्टा यांची प्रात्यक्षिके लहान मुलांनी सादर केली. जैन बांधव-भगिनी पारंपरिक वेशभूषेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. युवकांचा सहभागही विशेष लक्षवेधी ठरला. शहरातील विविध मार्गांवरून मार्गक्रमण करत शोभायात्रा दुपारी आदिनाथ स्थानक येथे पोहोचली. मार्गावर ठिकठिकाणी या शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले.

सोन्या मारुती चौकात आमदार हेमंत रासने, रमेश बागवे, प्रवीण चोरबेले, ॲड. अभय छाजेड, अजय खेडेकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून दर्शन घेतले.

यंदा पेट्रोल टंचाईसदृश्य परिस्थिती लक्षात घेऊन दरवर्षी काढली जाणारी युवकांची दुचाकी रॅली रद्द करून सामाजिक भान जपल्याची माहिती आयोजकांनी दिली.

शोभायात्रेचे आयोजन श्री जैन सामुदायिक उत्सव समिती, पुणे यांच्या पुढाकारातून करण्यात आले असून विविध जैन संघटनांचे सहकार्य लाभले.

## ‘अत्तर’चा गंध देशभर; केरळमध्ये मराठी कलाकृतीचा गौरव

पुणे (दै. संध्या) :

नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या सहाव्या केरळ लघुपट महोत्सवात मराठी चित्रपटसृष्टीसाठी अभिमानाची बाब घडली आहे. ‘अत्तर’ या लघुपटासाठी रामकुमार शेडगे यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचा पुरस्कार मिळाला, तर त्याच लघुपटातील बालकलाकार मीरा शेडगे यांना सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचा बहुमान प्राप्त झाला. यतीन कार्येकर म्हणाले, “‘अत्तर’ ही कलाकृती काळजाला हात घालणारी असून मुलीच्या संघर्षाची कहाणी पडद्यावर पाहताना प्रेक्षकांना प्रेरणा देते.” पुढे ते म्हणाले “रामकुमार हे अत्यंत संवेदनशील आणि अभ्यासू दिग्दर्शक आहेत. कथेला वास्तवाशी जोडून ती प्रभावीपणे पडद्यावर मांडण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. कलाकारांकडून उत्कृष्ट अभिनय करून घेण्याची त्यांची शैली खास आहे. या अगोदर देखील त्यांनी दर्जेदार कलाकृतींची निर्मिती केली आहे. रामकुमार शेडगे म्हणाले की “ या महोत्सवात उत्कृष्ट दिग्दर्शनाचा पुरस्कार आणि उत्कृष्ट बालकलाकार हे अत्यंत महत्वाचे पुरस्कार मिळाले. याचा मोठा आनंद आहे. “हा पुरस्कार माझ्यासाठीच नाही, तर संपूर्ण टीमच्या मेहनतीचं फळ आहे.

## ‘सी स्काउट्स अँड गाईड्स इंडिया’चा २५ वा स्थापना दिवस उत्साहात



पुणे (दै. संध्या) :

‘सी स्काउट्स अँड गाईड्स इंडिया’चा २५ वा स्थापना दिवस निगडी येथील सेंट उर्सुला शाळेत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचे कमांडंट व्हाइस ॲडमिरल अनिल जग्गी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

कार्यक्रमात सुमारे ४०० कॅडेट्सचा समावेश असलेली औपचारिक संचलन परेड, १२ तुकड्यांची पाहणी आणि मार्चपास्ट सादर करण्यात आला. या सोहळ्यास २५०० हून अधिक पालक उपस्थित होते. पाहणीदरम्यान व्हाइस ॲडमिरल जग्गी यांनी कॅडेट्सशी संवाद साधत त्यांच्या शिस्त, उत्साह आणि समर्पणाचे कौतुक केले.

कॅडेट्सनी सेमाफोर, मोर्स संकेत, बँडवादन, प्रकाश संकेत, तसेच पारंपरिक नृत्य आणि शिस्तबद्ध सरावाचे विविध प्रकार सादर केले. तसेच त्यांनी तयार केलेल्या जहाजांच्या प्रतिकृती—विशेषतः दूरनियंत्रित जहाजांचे—प्रदर्शनही आकर्षण ठरले.

व्हाइस ॲडमिरल जग्गी यांनी पालकांना संबोधित करत तरुणांनी भारतीय नौदलात करिअर करण्याचा विचार करावा, असे आवाहन केले. तसेच कॅडेट्सना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीला भेट देण्यासाठी आमंत्रित केले. संस्थेच्या २५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीबद्दल त्यांनी कमांडंट डॉ. गोपी शेट्टी यांचे अभिनंदन केले.

## *गोंधळी समाजाचा वधू-वर परिचय मेळावा*

# महापौर नागपुरे, धातुंडे यांचा नागरी सत्कार

**मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते ५ एप्रिलला समारंभ; परेश गरुड यांची माहिती**

पुणे (दै. संध्या) :

अखिल भारतीय गोंधळी समाज संघटना आणि गोंधळी व भटक्या विमुक्त जाती-जमाती विकास संघ, पुणे यांच्या वतीने समाजातील युवक-युवतींना विवाहासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी मोफत वधू-वर व पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या रविवारी (ता. ५ एप्रिल) सकाळी १० वाजता कर्वेनगर येथील शुभारंभ लॉन्स येथे हा मेळावा होणार आहे, अशी माहिती गोंधळी व भटक्या विमुक्त जाती-जमाती विकास संघाचे अध्यक्ष परेश गरुड यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी उपाध्यक्ष चंदन अटक, सचिव हरीष पाचंगे, खजिनदार रमेश उबाळे, अखिल भारतीय गोंधळी समाजाच्या सदस्य रजनी पाचंगे आदी उपस्थित होते.



परेश गरुड म्हणाले, "या कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, अध्यक्षस्थानी भटके विमुक्त विकास परिषद व प्रतिष्ठानचे अध्यक्ष उद्धवजी काळे असतील. तसेच पुण्याच्या महापौर मंजुषाताई नागपुरे आणि इचलकरंजीचे महापौर उदयजी धांडे यांचा नागरी सत्कार करण्यात येणार आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून वधू-वर नोंदणी, सर्वेक्षण तसेच जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला आणि कलाकार पेन्शन यांसारख्या शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. समाजातील तरुण-तरुणी, पालक, ज्येष्ठ नागरिक आणि कलाकार यांना एकत्र आणण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे."

गोंधळी, जोशी, बागडी, वासुदेव, चित्रकथी यांसह अन्य भटक्या व विमुक्त जाती-जमातीतील समाजबांधवांच्या कल्याणासाठी संस्थेच्या वतीने सातत्याने सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. तरुणांना रोजगाराची साधने उपल्बध करून देण्यासह महिलांना आरोग्य व कौशल्य विकासाच्या सुविधा, कला जोपासण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. हा कार्यक्रम सर्व समाज बांधवांसाठी विनामूल्य आहे. तरी अधिकाधिक समाज बांधवांनी या मेळाव्यात उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# १२ वर्षांच्या मुलीच्या पोटातून १६x१४ सेंमी केसांचा गोळा यशस्वीरित्या काढला

पुणे (दै. संध्या) :



सुकन्या (नाव बदलले आहे) नावाची ही रुग्ण, सुमारे दीड महिन्यापासून जेवणानंतर पोट भरल्यासारखे वाटणे, भूक न लागणे आणि दररोज उलट्या होणे याबद्दल तक्रार करत होती. उलट्या सहसा जेवणानंतर लगेच होत असत आणि हळूहळू त्यांची वारंवारता वाढू लागली, ज्यामुळे तिच्या कुटुंबीयांनी विशेष वैद्यकीय सल्ला घेण्याचा निर्णय घेतला. मुलीचे वजन ३९ किलोग्रॅम होते आणि तिला यापूर्वी कोणताही गंभीर आजार, शस्त्रक्रिया किंवा इतर वैद्यकीय समस्या नव्हती. तिचे लसीकरण आणि शारीरिक विकास तिच्या वयानुसार सामान्य होता.

नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल, मुंबईने, एका १२ वर्षांच्या मुलीवर यशस्वी उपचार केले, जिच्या पोटात ९० टक्क्यांहून अधिक जागा व्यापणारा केसांचा एक मोठा घट्ट गोळा (ट्रायकोबेझोअर) आढळला होता. रुग्णालयाच्या बालरोग गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी आणि बालरोग शस्त्रक्रिया पथकांनी एकाच सत्रात केलेल्या समन्वित हस्तक्षेपामुळे ही गुंतागुंतीची समस्या सोडवण्यात आली.

यामागील मूळ कारण समजून घेण्यासाठी रुग्णालयाच्या बाल मानसोपचार तज्ज्ञांच्या टीमनेही त्या मुलीची तपासणी केली. ट्रायकोबेझोअर्स अनेकदा ट्रायकोटिलोमेनिया आणि ट्रायकोफॅजिया यांसारख्या स्थितींशी संबंधित असतात, ज्यामध्ये व्यक्ती स्वतःचे केस उपटून खाते. हे वर्तन अनेकदा मानसिक ताण, चिंता किंवा भावनिक त्रासाशी संबंधित असते आणि बऱ्याच प्रकरणांमध्ये ते बराच काळ लक्षात येत नाही. भविष्यात पुनरावृत्ती टाळण्यासाठी वेळेवर केलेले मानसिक उपचार, वर्तणूक थेरपी आणि भावनिक आधार यांच्या महत्त्वाविषयी टीमने कुटुंबाला समुपदेशन केले. हे प्रकरण मुलांमधील सततच्या पचनसंस्थेच्या लक्षणांचे वेळेवर निदान करण्याचे महत्त्व आणि ट्रायकोबेझोअर्ससारख्या दुर्मिळ परंतु गंभीर आजारांवर उपचार करण्यासाठी सर्वांगीण व बहुशाखीय काळजीची गरज अधोरेखित करते.

क्लिनिकल तपासणीदरम्यान, डॉ. आदित्य कुलकर्णी, सल्लागार – बालरोग गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी आणि हेपॅटोलॉजी, नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल, मुंबई यांना पोटाच्या डाव्या वरच्या भागात एक गाठ जाणवली. रक्त तपासणीनंतर, सीटी स्कॅनमध्ये पोटाच्या पोकळीत ९० टक्क्यांहून अधिक पसरलेला एक मोठा गोळा दिसून आला, ज्यामुळे ट्रायकोबेझोअरची शक्यता वर्तवण्यात आली.

त्यानंतर अप्पर गॅस्ट्रोइंटेस्टाइनल एंडोस्कोपी करण्यात आली, ज्यामध्ये श्लेष्माने (म्युकसने) झाकलेला आणि पोटापासून लहान आतड्याच्या सुरुवातीपर्यंत पसरलेला केसांचा एक मोठा गोळा (हेअरबॉल) आढळून आला.

सुरुवातीला जनरल ॲनेस्थेशिया देऊन एंडोस्कोपीद्वारे तो गोळा काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचे लहान तुकडे काढण्यात आले, परंतु केसांच्या गोळ्याचा मोठा आकार आणि घनता यामुळे तो पूर्णपणे काढण्यासाठी ही पद्धत सुरक्षित नव्हती. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन, डॉ. रसिकलाल शाह, वरिष्ठ सल्लागार – बालरोग शस्त्रक्रिया यांच्या नेतृत्वाखालील बालरोग शस्त्रक्रिया टीमने त्याच शस्त्रक्रिया सत्रात ओपन सर्जरी करण्याचा निर्णय घेतला.

पोटाच्या वरच्या भागात छेद घेऊन पोट काळजीपूर्वक उघडण्यात आले आणि सुमारे १६ x १४ सेंटीमीटर आकाराचा, पोटाच्या आकाराचा केसांचा एक मोठा गोळा सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आला. त्यानंतर पोट आणि पोटाच्या भिंतीला काळजीपूर्वक टाके घालण्यात आले. काढलेला गोळा प्रयोगशाळेतील तपासणीसाठी पाठवण्यात आला, जिथे तो केस, अन्नाचे कण आणि श्लेष्मा (म्युकस) यांनी बनलेला 'ट्रायकोबेझोअर' (केसांचा गोळा) असल्याचे निष्पन्न झाले आणि त्यात कर्करोगाची कोणतीही चिन्हे आढळली नाहीत. एंडोस्कोपी आणि ओपन सर्जरी यांचा समावेश असलेली ही संपूर्ण प्रक्रिया, सुमारे तीन तास चाललेल्या एकाच सत्रात पूर्ण झाली.

शस्त्रक्रियेनंतर, त्या मुलीला बालरोग विभागात निरीक्षणाखाली ठेवण्यात आले. तिसऱ्या दिवशी, तिला पाणी देण्यास सुरुवात करण्यात आली आणि त्यानंतर हळूहळू मऊ आहार सुरू करण्यात आला. ती उलट्या न करता सामान्यपणे खाऊ लागली आणि सात दिवसांच्या आत, पुढील काळजी, जखमेची स्वच्छता आणि टप्प्याटप्प्याने आहाराच्या सूचनांसह तिला रुग्णालयातून घरी सोडण्यात आले.

या प्रकरणाबद्दल स्पष्टीकरण देताना डॉ. आदित्य कुलकर्णी म्हणाले, "मानवी केस पचत नाहीत. बराच काळ गिळल्यावर ते पोटात साठतात आणि त्यांचा एक घट्ट गोळा तयार होतो. या प्रकरणात, ट्रायकोबेझोअर्स बहुधा ३ ते ४ वर्षांत हळूहळू विकसित झाले असावेत. मुलांमध्ये सतत पोट भरल्यासारखे वाटणे आणि वारंवार उलट्या होणे याकडे कधीही दुर्लक्ष करू नये."

डॉ. रसिकलाल शाह यांनी पुढे सांगितले, "मोठे ट्रायकोबेझोअर्स एंडोस्कोपीने काढणे कठीण असते आणि त्यासाठी ओपन सर्जरीची आवश्यकता असते. विविध तज्ज्ञांशी समन्वय साधून, आम्ही एकाच सत्रात हा गोळा सुरक्षितपणे काढू शकलो आणि रुग्णाची प्रकृती सुरळीत सुधारेल याची खात्री केली."

## थोडक्यात पण महत्वाचे...

### एमआयटी-एडीटी विद्यापीठाला 'डास्का' मानांकन

■ एआय व डेटा सायन्स अभ्यासक्रमांसाठी मिळाला आंतरराष्ट्रीय दर्जा; ठरले महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ

पुणे (दैनिक संध्या) : एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाला (एमआयटी-एडीटी) डेटा सायन्स कौन्सिल ऑफ अमेरिका (DASCA) यांचे मानांकन प्राप्त झाले असून, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डेटा सायन्स क्षेत्रातील उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. या मानांकनासह विविध एआय व डेटा सायन्स अभ्यासक्रमांसाठी 'डास्का' मान्यता मिळवणारे महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ ठरण्याचा मान 'एमआयटी-एडीटी'ला मिळाला आहे. हे मानांकन ११ पदवी, ३ पदव्युत्तर तसेच पीएच.डी. स्तरावरील संगणक शास्त्र आणि अभियांत्रिकी / माहिती तंत्रज्ञान या शाखेतील अभ्यासक्रमांना प्रदान करण्यात आले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा ॲनालिटिक्स, क्लाऊड कॉम्प्युटिंग, सायबर सिक्युरिटी, ब्लॉकचेन आणि इंटेलिजंट सिस्टिम्स या आधुनिक डेटा सायन्स व एआयच्या मूलभूत तंत्रज्ञान क्षेत्रांचा यात समावेश आहे. 'डास्का' मानांकन जागतिक दर्जाच्या अभ्यासक्रम रचना, शैक्षणिक गुणवत्ता आणि उद्योगाभिमुखतेशी सुसंगतता सिद्ध करणाऱ्या संस्थांनाच प्रदान केले जाते. हे मानांकन डेटा-आधारित अर्थव्यवस्थेच्या बदलत्या गरजांनुसार विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानासह शिक्षण देणाऱ्या जागतिक स्तरावरील संस्थांना बहाल केले जाते. या मानांकनामुळे डास्काच्या 'वर्ल्ड डेटा सायन्स अँड एआय इनिशिएटिव्ह' (डब्ल्यूडीएसएआय) अंतर्गत जागतिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी विद्यापीठाला मिळणार असून, प्राध्यापक प्रशिक्षण, संशोधन सहकार्य आणि सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापनेस चालना मिळणार आहे. एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी विद्यापीठाच्या या जागतिक यशाबद्दल आनंद व्यक्त करताना म्हटले की, विज्ञान, तंत्रज्ञान आणि मानवी मूल्यांचा समन्वय साधणारी शिक्षण व्यवस्था उभारण्याचा एमआयटी-एडीटी विद्यापीठाचा सातत्यपूर्ण प्रयत्न असतो. भारतातील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील कौशल्याधिष्ठित शिक्षण पुरविण्याचा आमचा मानस असून, डास्का मानांकनामुळे त्या प्रयत्नांना मोठे बळ मिळाले आहे.

# प्रख्यात गायिका माणिक वर्मा यांच्या जन्मशताब्दीनिमित्त कर्तृत्वान महिलांचा सन्मान



पुणे (दै. संध्या) : कै. सुधाकर वामन खंडागळे अध्यासन, दुर्गम प्रतिष्ठान, उत्कर्ष महिला मंडळ आणि लायन्स क्लब ऑफ पुणे सहकारनगर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच भरत नाट्य संशोधन मंदिर यांच्या सहकार्याने प्रख्यात शास्त्रीय गायिका माणिक वर्मा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा व 'स्वरगंध' प्रस्तुत 'गंधार रंजन 2026' हा संगीत कार्यक्रम भारत नाट्य मंदिर येथे उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमंत दगडूशेठ ट्रस्ट मंडळाचे अध्यक्ष सुनील रासने होते. त्यांच्या हस्ते तसेच भरत नाट्य संशोधन मंदिराचे अध्यक्ष पांडुरंग मुखडे आणि लायन्स क्लब ऑफ पुणे सहकारनगरचे मिलिंद तलाठी यांच्या उपस्थितीत कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्यात आला. यावेळी कै. सुधाकर वामन खंडागळे अध्यासनचे अध्यक्ष डॉ. प्रसाद खंडागळे, दुर्गम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष नंदकुमार जाधव, उत्कर्ष महिला मंडळ व आधार सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष दिलीप काळोखे, रवींद्र पठारे, प्रतिशिर्डी संस्थानचे विश्वस्त रवी जाधव, नीलम खंडागळे, सविता काळोखे, उल्हास कदम, अशोक जाधव, पुरन हुडके आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात माणिक वर्मा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या प्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रत्नप्रभा गिरे (सांप्रदायिक कार्य), लता जाधव (चित्रपट निर्मिती), सुनंदा मोरे (सामाजिक कार्य), हेमा टाकळीकर (पाककला प्रशिक्षिका), विद्या ताम्हणकर (पुणेरी सुगरण संस्था), स्वाती शेठ (सामाजिक कार्य), विभावरी जाधव (अध्यक्षा, प्रतीशिर्डी संस्थान), ईशा पठारे (राज्यस्तरीय खेळाडू), कल्याणी कदम (महिला मंच) आणि विजया झेंडे (बाल संगोपन केंद्र) यांचा सन्मान करण्यात आला. प्रख्यात गायिका माणिक वर्मा यांच्या जन्मशताब्दीच्या औचित्य साधून चार सामाजिक संस्थेने दिलेले पुरस्कार ऊर्जा देणारे आहेत. आमच्या क्षेत्रात काम करण्यास आणखी बळ मिळाले असल्याचे यावेळी महिलांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. प्रसाद खंडागळे यांनी केले. सूत्रसंचालन दिलीप काळोखे यांनी केले. नंदकुमार जाधव यांनी आभार मानले.

यानंतर 'गंधार रंजन 2026' या कार्यक्रमात दोन गंधारांचा प्रयोग असलेल्या रागांच्या बंदिशी, नाट्यगीते आणि भक्तिगीतांचा सुरेल आविष्कार सादर करण्यात आला. गायिका डॉ. राजश्री महाजन आणि गायक सोमनाथ जायदे यांनी 'लाविते मी निरांजन त्या सावळ्या तनूचे', कौसल्येचा राम, वृंदावनात माझ्या, एक धागा सुखचा, जाने कहाँ, कही दीप जले ही गीतांसह जाग, शिवरंजनी, तराणा, मिश्र किरवाणी व भैरवीची रचना त्यांनी सादर केली. कौसल्येचा राम हे व्हायोलिन व हार्मोनियमवर माधवी करंदीकर व डॉ. नीलिमा राडकर यांनी सादर करुन प्रक्षेकांचे मने जिंकली. कार्यक्रमात माणिक वर्मा यांच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या संगीत प्रवास उलगडण्यात आला. त्यांना अभिजित जायदे (तबला), डॉ. नीलिमा राडकर (व्हायोलिन) आणि माधवी करंदीकर (हार्मोनियम) यांची साथसंगत लाभली. यशश्री पुणेकर यांनी निवेदन केले.

# भारती एअरटेल कडून नेक्स्ट्रा डेटा लिमिटेड मध्ये US$1 अब्ज गुंतवणुकीची घोषणा

पुणे (दै. संध्या) : भारती एअरटेल यांनी आज जाहीर केले की अल्फा वेव्ह ग्लोबल, कार्लाइल आणि अँकरेज कॅपिटल यांच्या सहयोगी संस्थांमार्फत नेक्स्ट्रा डेटा लिमिटेड मध्ये १ अब्ज अमेरिकन डॉलर गुंतवणूक करण्यात येणार आहे. नेक्स्ट्रा ही एअरटेलची डेटा सेंटर व्यवसायातील उपकंपनी असून, भारतभर तिच्या नेटवर्कचा विस्तार आणि वाढीला गती देण्यासाठी ही गुंतवणूक केली जात आहे. एअरटेल देखील या गुंतवणूक फेरीत सहभागी होणार आहे. या करारानुसार, अल्फा वेव्ह ग्लोबल ४३५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स, कार्लाइल २४० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स आणि अँकरेज कॅपिटल ३५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स गुंतवणूक करणार आहेत, तर उर्वरित रक्कम एअरटेलकडून दिली जाईल.

व्यवहार पूर्ण झाल्यानंतर आवश्यक समायोजनांच्या अधीन राहून गुंतवणूकदारांचा अंतिम समभाग वाटा निश्चित केला जाईल. नेक्स्ट्रा मध्ये एअरटेलचा नियंत्रक हिस्सा कायम राहणार आहे. हा व्यवहार भारतातील नियामक मंजुरींवर अवलंबून आहे. Nxtra - भारतातील पहिली डेटा सेंटर कंपनी ज्यांनी पूर्वानुमानाधारित देखभाल, ऊर्जा कार्यक्षमता आणि स्वयंचलित कार्यप्रणालीसाठी मोठ्या प्रमाणावर AI चा वापर केला आहे. या निधीचा उपयोग आपल्या वाढीच्या योजना गतीमान करण्यासाठी करणार आहे. कंपनी आपली पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर विस्तारण्याची आणि सेवा पोर्टफोलिओ अधिक व्यापक करण्याची योजना आखत आहे, ज्यामुळे देशभरातील उद्योग, hyperscalers आणि सरकारी संस्थांच्या बदलत्या गरजा पूर्ण करता येतील. भारताचा डेटा सेंटर क्षेत्र सध्या वेगाने वाढत आहे, ज्यामागे उद्योगांमधील डिजिटल परिवर्तनाचा वेग, क्लाउड सेवांचा वाढता स्वीकार आणि हायपरस्केलर कडून वाढती मागणी ही प्रमुख कारणे आहेत. सॅव्हिल्स इंडिया च्या अहवालानुसार, २०२४ ते २०३० दरम्यान भारतातील डेटा सेंटर बाजार सुमारे २१% चक्रवाढ वार्षिक वृद्धीदराने (CAGR) वाढून जवळपास ३,४०० मेगावॅट आयटी क्षमता गाठण्याची अपेक्षा आहे.

# वार्षिक स्नेहसंमेलन व कार्यशाळा उद्‌घाटन कार्यक्रम संपन्न




पुणे (दै. संध्या) : जीवन वर्धिनी दिव्यांग विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व कार्यशाळा उद्‌घाटनाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन पाहुण्यांच्या हस्ते करून व त्यांच्याच शुभहस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन करून झाली. विद्यालयातील मुलांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून 'हेन्कल' (Henkel) कंपनीचे (RND). मॅनेजर डॉ. प्रसाद खंडागळे सर व त्यांचे सहकारी श्री. सोनार सर उपस्थित होते. तसेच जिल्हा परिषदेच्या सदस्या सौ. रूपालीताई अमोल झेंडे यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

प्रथम मुलांचे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम संपन्न झाले. त्यानंतर पाहुण्यांचा परिचय व स्वागत झाले. प्रमुख पाहुणे डॉ. प्रसाद खंडागळे सर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "या मुलांना फक्त शालेय शिक्षण देऊन उपयोग नाही, तर त्यांना व्यावसायिक शिक्षण देणे गरजेचे आहे." याच हेतूने त्यांनी कंपनीच्या सी.एस.आर. (CSR) निधीतून संस्थेसाठी विविध प्रकारच्या उत्पादक मशिनरी (अंदाजे ३ लाख रुपये) व इमारत बांधकाम तसेच सोलर लाईटसाठी भरीव मदत केली आहे. ही मदत यापुढेही सुरू राहील, असे आश्वासन त्यांनी दिले.

त्यानंतर सौ. रूपालीताई अमोल झेंडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "हे काम अतिशय अवघड आहे, परंतु संस्था गेली ४० वर्षे हे काम नेटाने करीत आहे. यापुढे माझ्या माध्यमातून कोणतीही मदत लागल्यास मी देण्यास तत्पर आहे." कार्यक्रमाच्या उत्तरार्धात पाहुण्यांच्या हस्ते वर्षभर मुलांनी विविध स्पर्धांत मिळवलेल्या बक्षिसांचे वितरण करण्यात आले. संस्थेचे संस्थापक श्री. बाळासाहेब झेंडे यांनी संस्थेच्या कार्याविषयी थोडक्यात माहिती दिली व भविष्यात सर्वांच्या मदतीची अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. प्रमोद कारकर यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय संस्थेचे उपाध्यक्ष श्री. तानाजी सातव यांनी करून दिला. सांस्कृतिक कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. सायली पिलाने यांनी केले. त्यानंतर श्री. विजयकुमार जाधव (सोशल वर्कर) यांनी दिव्यांग मुलांच्या प्रगतीसाठी असणाऱ्या सर्व शासकीय योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाचे आभार सौ. सायली पिलाने यांनी मानले. या कार्यक्रमास वसतिगृहाचे अधीक्षक, संस्थेचे खजिनदार श्री. मयुर बाळासाहेब झेंडे , तसेच श्री. लहु कुंजीर व विकी पिलाने , सर्व संचालक, विद्यालयातील संपूर्ण कर्मचारी वृंद व बहुसंख्येने पालक उपस्थित होते.

## किंगफिशर स्मूथ महाराष्ट्रात लॉन्च, किंगफिशरच्या मुख्य स्ट्रॉंग बिअर पोर्टफोलिओचा विस्तार




नवी दिल्ली (दै. संध्या) : HEINEKEN कंपनीचा भाग असलेल्या युनायटेड ब्रुअरीज लिमिटेड (UBL) ने आज महाराष्ट्रात किंगफिशर स्मूथ लॉन्च केल्याची घोषणा केली. किंगफिशर पोर्टफोलिओमधील हा एक महत्त्वाचा नवीन प्रकार असून, तो मुख्य स्ट्रॉंग बिअर विभागात ब्रँडची उपस्थिती अधिक मजबूत करतो. कंपनी सध्या जास्त विक्री होणाऱ्या हंगामासाठी तयारी करत आहे. या लॉन्चमुळे किंगफिशर स्मूथला वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांमध्ये विस्तार करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे. मजबूत रिटेल नेटवर्क आणि मोठा ग्राहक वर्ग असलेल्या महाराष्ट्रात विस्तारासाठी मोठी संधी आहे. यापूर्वी राजस्थान आणि कर्नाटकमध्ये किंगफिशर स्मूथला ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. ज्यांना अधिक स्मूथ आणि सहज पिण्याचा अनुभव हवा आहे अशा ग्राहकांसाठी किंगफिशर स्मूथ तयार करण्यात आले आहे. यात चवीशी तडजोड न करता संतुलित फ्लेवर मिळतो. आयात केलेल्या हॉप्सचा वापर करून आणि कोणतीही साखर न घालता ही बिअर तयार केली जाते. त्यामुळे ती स्वच्छ आणि स्मूथ फिनिश देते, तसेच स्ट्रॉंग बिअर पिणाऱ्यांना आवडणारी ताकदही राखते. त्यामुळे ती निवांत प्रसंगांसाठी योग्य ठरते. या लॉन्चबद्दल बोलताना, युनायटेड ब्रुअरीज लिमिटेडचे चीफ मार्केटिंग ऑफिसर विक्रम बहल म्हणाले, "किंगफिशर स्मूथद्वारे आम्ही अशा बिअरकडे वळणाऱ्या ग्राहकांच्या गरजेला प्रतिसाद देत आहोत ज्यात चव आणि ताकद यांचा उत्तम मेळ असतो. त्याच्या स्मूथ चवीमुळे, किंगफिशर स्मूथ विविध सामाजिक प्रसंगांसाठी योग्य ठरेल आणि मित्रांसोबतच्या निवांत क्षणांसाठी खास ठरेल." किंगफिशर स्मूथमुळे किंगफिशर स्ट्रॉंगसोबत ब्रँडच्या प्रमुख उत्पादनांच्या श्रेणीत आणखी पर्याय उपलब्ध होतात. सध्या हे उत्पादन मुंबई आणि पुण्यातील प्रमुख रिटेल दुकानांमध्ये उपलब्ध आहे आणि एप्रिलपासून संपूर्ण महाराष्ट्रात उपलब्ध होईल. याची किंमत 330 मि.ली. बाटलीसाठी ₹125, 330 मि.ली. कॅनसाठी ₹120, 500 मि.ली. कॅनसाठी ₹155 आणि 650 मि.ली. बाटलीसाठी ₹200 आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात सविस्तर वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालक सचिन लक्ष्मण बोचरे, संतोष लक्ष्मण बोचरे व शुभांगी संजय नेहरकर यांचे मालकीची आहे. सदरची मिळकत ही विद्यमान मालक यांचे प्रत्यक्ष ताबे वहिवाटीस असुन, तिची विक्री करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार असल्याचा भरवसा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. सदरील मिळकतीबाबत विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांकडुन रक्कम स्वीकारुन मिळकत कायम खुष खरेदी देण्याचे निश्चित केलेले आहे.

सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचे तोंडी अथवा लेखी करारमदार, खरेदी, अदलाबदल, गहाण, दान, ट्रस्ट, विकसनाचे अधिकार, वारसाहक्क, मृत्युपत्र, ताबा, लिसपेन्डन्स, लायसेन्स, लीन, मेन्टेनन्स, भाडेपट्टा, कुळ, पोटगी, अन्य वहिवाट अथवा अन्य हक्कहितसंबंध अथवा कुलमुखत्यारपत्राद्वारे अथवा अग्रहक्काने कोणतेही हक्क असल्यास त्यांनी सदर नोटिस प्रसिद्ध होताच १० दिवसांचे आत कागदपत्रांनिशी आमच्याकडे लेखी कळवून खात्री करून द्यावी. अन्यथा त्यांनी त्यांचे तथाकथित हक्क हितसंबंध जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार करतील व तथाकथित हक्कहितसंबंध आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

तुकडी पुणे, पोट तुकडी जुन्नर, ता. जुन्नर, मे. दुय्यम निबंधक साहेब, जुन्नर यांचे हद्दीतील जिल्हा परिषद पुणे, तालुका पंचायत समिती जुन्नर येथील गाव मौजे बल्लाळवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील १. गट क्र. २५७ क्षेत्र ०१ हे १० आर, आकार ०३ रू. ७५ पैसे यापैकी सचिन लक्ष्मण बोचरे व इतर यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र ०० हे १३.७५ आर, आकार ०० रू. ४६.७५ पैसे, २. गट क्र. ७९८/१ क्षेत्र ०१ हे ६८ आर, पो.ख. ०० हे १३ आर, एकुण ०१ हे ८१ आर, आकार ०३ रू. ०५ पैसे यापैकी सचिन लक्ष्मण बोचरे व इतर यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र ०० हे २१ आर, पो.ख. ०० हे ०१.६२.५ आर, एकुण ०० हे २२.६२.५ आर, आकार ०० रू. ३८.२५ पैसे, ३. गट क्र. ७९८/२ क्षेत्र ०० हे ५७.७० आर, पो.ख. ०० हे १९ आर, एकुण ०० हे ७६.७० आर, आकार ०१ रू. ३७ पैसे यापैकी सचिन लक्ष्मण बोचरे व इतर यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र ०० हे ०७.२१.२५ आर, पो.ख. ०० हे ०२.३७ आर, एकुण ०० हे ०९.५८.२५ आर, आकार ०० रू. १७ पैसे, ४. गट क्र. ७९८/३ क्षेत्र ०१ हे ०१ आर, पो.ख. ०० हे ०३ आर, एकुण ०१ हे ०४ आर, आकार ०३ रू. ०४ पैसे यापैकी सचिन लक्ष्मण बोचरे व इतर यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र ०० हे १२.६२ आर, पो.ख. ०० हे ००.३७ आर, एकुण ०० हे १२.९९ आर आकार ०० रू. ३८ पैसे, ५. गट क्र. ८०० क्षेत्र ०२ हे ६६ आर, पो.ख. ०० हे ०२ आर, एकुण ०२ हे ६८ आर, आकार ०२ रू. ३८ पैसे यापैकी सचिन लक्ष्मण बोचरे व इतर यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र ०० हे ३३.२५ आर, पो.ख. ०० हे ००.००.२५ आर, एकुण ०० हे ३३.५० आर, आकार ०० रू. २९.७५ पैसे, ६. गट क्र. ८०३ क्षेत्र ०४ हे ९८ आर, पो.ख. ०४ हे ९८ आर, एकुण ०९ हे ९६ आर, आकार ०१ रू. ८८ पैसे यापैकी सचिन लक्ष्मण बोचरे व इतर यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र ०० हे ३१.१२ आर, पो.ख. ०० हे ३१.१२ आर, एकुण ०० हे ६२.२४ आर, आकार ०० रु. ११.७५ पैसे

येणेप्रमाणे मिळकती कोणतेही हक्क राखून न ठेवता.

सही/-
विश्वजीत अर्जुन थोरात
ॲडव्होकेट (बी.एसएल, एल.एल.)
पत्ता - श्री. स्वामी समर्थ संकुल, फेज ए, शॉप क्र. ११, एस.टी. स्टॅण्ड जवळ, पुना नाशिक हायवे, मु.पो. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.
मो. नं ९७३०५१९०४२

## राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६
### [कलम ३(G) (३) (१) (२) पहा]
### संपादित जमीनीतील हितसंबंधाबाबत जमीन मालकांचे किंवा हितसंबंधित व्यक्तींचे अर्ज मागविण्यासाठी जाहीर नोटीस

ज्या अर्थी, भारत सरकार सडक, परिवहन व महामार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडुन राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ (१९५६ चा ४८) च्या कलम ३A (१) खालील अधिसूचना १. क्र.का.आ. २३२२ (अ) दिनांक २६/०५/२०२५ रोजी भारत सरकारच्या असाधारण राजपत्र पै. II खंड ३ उपखंड (ii) मध्ये प्रसिध्द करण्यात आली असून असे अधिसूचित करणेत आले होते, की त्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचिमध्ये स्थूलमानाने दर्शविण्यात आलेल्या जमिनीची महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० (SPUR) (जुना राज्य मार्ग क्रमांक ११२ व १२९) प्रकल्प भिमाशंकर तळेघर वाडा ते राजगुरुनगर राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० (SPUR) कि.मी. २+९२८ ते ६३+३७८ एकुण लांबी २.९२८ कि.मी. पर्यंतच्या जमिनींच्या रुंदीकरणासाठी तसेच देखभाल, व्यवस्थापन आणि प्रचलन या सार्वजनिक प्रयोजनासाठी सोबत दिलेल्या अनुसूचीमध्ये ज्याचे संक्षिप्त वर्णन दिले आहे, त्या जमिनी संपादनाचा हेतु या नोटीसव्दारे प्रसिध्द करीत आहे.

आणि उक्त अधिनियमाचे कलम ३ A (३) खालील अधिसूचना दि. २९/१२/२०२५ रोजीची अधिसूचना दिनांक-११/०६/२०२५ रोजी द इकॉनॉमिक टाईम्स आणि दैनिक जनमंथन दिनांक-१०/०६/२०२५ रोजी प्रकाशित करणेत आली होती.

आणि त्याअर्थी भारत सरकार, सडक व परिवहन व महामार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडुन राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ (१९५६ चा ४८) च्या कलम ३D (१) खालील अधिसूचना क्रमांक का.आ. ५२०६ (अ) दि. १७/११/२०२५ रोजी भारत सरकारच्या असाधारण राजपत्र पै. II खंड ३ उपखंड (ii) मध्ये प्रसिध्द करण्यात आली असून, असे अधिसूचित करणेत आले आहे. की या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचित स्थूलमानाने दर्शविण्यात आलेल्या जमिर्नीची महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० (SPUR) राज्य मार्ग क्रमांक ११२ व १२९ भिमाशंकर-तळेघर- वाडा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० (SPUR) कि.मी. २+९२८ ते ६३+३७८ पर्यंतच्या जमिनींच्या रुंदीकरणासाठी तसेच देखभाल, व्यवस्थापन आणि प्रचलन कामी सक्षम प्राधिकाऱ्याचा कलम ३D (१) खालील अहवाल प्राप्त झाल्यानंतर सर्व हरकतीचा विचार करुन संपादित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३D (२) उपबंधानुसार या जमिनी भारत सरकारच्या राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून खालील अनुसूचित नमूद केलेल्या जमिनी बोजाविरहित केंद्र शासनाकडे निहीत झाल्या आहेत.

आणि त्याअर्थी सक्षम प्राधिकारी त्यांना कायद्याप्रमाणे असणाऱ्या अधिकारांचा वापर करुन संपादनाखालील जमिनीची हितसंबंधितांना द्यावयाची नुकसान भरपाई निश्चित करण्याची प्रक्रिया सुरु करीत आहेत आणि म्हणून संपादनाखालील जमिनीत हितसंबंध असणाऱ्या सर्व हितसंबंधित व्यक्तींना याद्वारे नोटीस देण्यात येत आहे की, जमिनीतील हितसंबंधितांचे असणारे त्यांचे हक्काचे स्वरुप व नुकसान भरपाई संदर्भातील त्यांच्या मागण्यासंबंधीचे निवेदन सक्षम प्राधिकारी यांचे समोर सदर नोटीसीच्या दिनांकापासुन ७ दिवसापर्यंत स्वतः जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत हजर होऊन देण्यात यावे.

असेही घोषित करण्यात येत आहे, की संपादित क्षेत्रातील हितसंबंधित व्यक्तीकडुन सक्षम प्राधिकाऱ्यासमोर नेमून दिलेल्या तारीख, वेळ व ठिकाणी हजर होण्यास कसूर झाल्यास, तसेच जमिनीतील हक्कांचे स्वरुप व नुकसान भरपाई संबंधातील मागण्या संबंधित योग्य व कायदेशीर पुराव्यासहीत निवेदन न केल्यास संबंधितास याबाबत काहीही निवेदन करावयाचे नाही, असे गृहीत धरुन नुकसान भरपाईची रक्कम नियमाप्रमाणे निश्चित करण्यात येईल.

अनुसूची
संपादित जमिनीचा तपशील

तालुका :- खेड — जिल्हा :- पुणे

| अ. क्र. | गाव | भूमापन क्रमांक /गट क्रमांक | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | बुरसेवाडी | १५५(१४) सरकारी | ०.०७३४ |
| २. | | १५६(१५) | ०.०३३१ |
| ३. | | १५७(११) | ०.९२६७ |
| ४. | | १६०(१०) | ०.२७१२ |
| ५. | | १८९(९) | ०.२९११ |
| ६. | | १९०(८) | ०.५४७३ |
| ७. | | २२९(१०२) | ०.०८३१ |
| ८. | | २३०(१०१) | ०.३३६४ |
| ९. | | २३४ (९७) | ०.०३४८ |
| १०. | | २४१(९०) | ०.१४५१ |
| ११. | | २७६ (८३) सरकारी | ०.११८७ |
| | | एकुण | २.८६०९ |

दिनांक : ०४/०३/२०२६
ठिकाण : खेड (पुणे)

सही/-
(अनिल दौंडे)
सक्षम प्राधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी
खेड उपविभाग खेड (राजगुरूनगर)

जिमाका/पुणे/जाहिरात/९४२/२०२५-२६

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पीसीयूच्या अथर्व भागवत याने राष्ट्रीय आर्म रेसलिंग मध्ये पटकावले रौप्य पदक

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) मधील बी.एस्सी. न्यूट्रिशन अँड डायटेटिक्स शाखेतील विद्यार्थी अथर्व अविनाश भागवत याने ऑल इंडिया इंटर-युनिव्हर्सिटी आर्म रेसलिंग चॅम्पियनशिप २०२५-२६ मध्ये पुरुष विभागात ८५ किलो वजन गटात रौप्य पदक पटकावले. अलिगढ येथील राजा महेंद्र प्रताप सिंह विद्यापीठ येथे असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली यांच्या वतीने आयोजित या स्पर्धेत पीसीयू क्रीडा संचालक डॉ. विवेक भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली अथर्व भागवत याने हे यश संपादन केले. त्याचे अभिनंदन करताना पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संतोष सोनावणे यांनी सांगितले की, पीसीयू मधील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रम बरोबर क्षेत्रातच क्रीडा क्षेत्रासाठी देखील प्रोत्साहन आणि मार्गदर्शन केले जाते. त्यासाठी आवश्यक त्या सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात त्यामुळेच पीसी मधील विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर क्रीडा स्पर्धेत यश मिळवत आहेत. पीसीयूच्या वतीने अथर्व भागवत याचा सत्कार करण्यात आला. यावेळी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, पीसीइटी अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम, गराडे, व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई तसेच प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, कुलसचिव डॉ. अनिल महेश्वरी, विभाग प्रमुख डॉ. रुचू कुथियाला यांनी अभिनंदन केले.



### आंतरराष्ट्रीय पदक विजेत्या खेळाडूंना महापालिकेत थेट नियुक्ती द्या


पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक खेळाडू अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, मर्यादित साधनसामग्रीत आणि अथक मेहनतीच्या जोरावर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. हे खेळाडू केवळ पदके जिंकत नाहीत, तर शहराचा मान उंचावत आहेत. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय पदक विजेत्या खेळाडूंना पिंपरी-चिंचवड महापालिकेत थेट नोकरीत नियुक्ती देण्यात यावी, अशी मागणी भाजपा क्रीडा शहराध्यक्ष अरुण पाडुळे यांनी केली आहे. तसेच राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना शिष्यवृत्ती योजना, अत्याधुनिक क्रीडा साहित्य आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षक उपलब्ध करून देण्याचीही मागणी त्यांनी निवेदनाद्वारे क्रीडा सभापती कैलास कुटे यांच्याकडे केली आहे. यावेळी बोलताना अरूण पाडुळे म्हणाले की, "खेळाडूंना योग्य मार्गदर्शन, दर्जेदार प्रशिक्षण आणि सुविधा मिळाल्यास ते देशाचे नाव जागतिक पातळीवर उज्ज्वल करू शकतात. आज खेळाडूंना आधार देणे म्हणजे उद्याच्या सक्षम भारताची पायाभरणी होय." या प्रसंगी क्रीडा सभापती कैलास कुटे, नगरसेवक कुंदन गायकवाड, योगेश लांडगे, उदय गायकवाड तसेच शाम जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. "खेळाडू घडले तर शहर घडते," या भावनेतून शहरातील प्रत्येक खेळाडूच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील, अशी बांधिलकी यावेळी व्यक्त करण्यात आली.

### मिळकत करात सवलत देणाऱ्या 'अभय योजने'ला मुदतवाढ द्या; मनसेची मागणी



पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून मालमत्ता करावरील दंडात ९० टक्के सवलत देणारी 'अभय योजना' सध्या सुरू असून या योजनेची अंतिम मुदत ३१ मार्च २०२६ निश्चित करण्यात आली आहे. मात्र, या योजनेला मुदतवाढ देण्याची मागणी मनसे पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली आहे. मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी या सदर्भात महापौर रवी लांडगे यांना निवेदन दिले आहे. यावेळी सचिव मनोज लांडगे, कामगार सेना प्रतिनिधी नितीन सुर्यवंशी, शाखाध्यक्ष सुधाकर अर्जुन, बंटी कांबळे आणि आजम शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड शहरातील बहुतांश नागरिक हे कामगार वर्गातील असून त्यांचे पगार साधारणतः महिन्याच्या १० तारखेच्या आसपास होतात. त्यामुळे एकरकमी मालमत्ता कर भरणे अनेकांना शक्य होत नाही. तसेच झोपडपट्टीधारकांना कर भरण्यासाठी तीन ते चार हप्त्यांमध्ये रक्कम भरण्याची सुविधा द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर 'अभय योजना'ची मुदत वाढवून अधिकाधिक नागरिकांना सवलतीचा लाभ मिळावा, अशी नम्र विनंती संबंधित पदाधिकाऱ्यांनी पालिका प्रशासनाकडे केली आहे.

### पिंपरी-चिंचवड शहरात अचानक पावसाची हजेरी; उकाड्यापासून नागरिकांना दिलासा



पिंपरी (दैनिक संध्या): पिंपरी-चिंचवड शहरात दुपारच्या सुमारास अचानक पडलेल्या पावसाच्या सरींमुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. सकाळपासून कडक उन्हामुळे तापमानात वाढ झाली होती, त्यामुळे नागरिक त्रस्त झाले होते. मात्र दुपारी अचानक वातावरणात बदल होऊन आकाश ढगाळ झाले आणि शहरातील विविध भागांत काही ठिकाणी जोरदार तर काही ठिकाणी रिमझिम पावसाने हजेरी लावली. या अनपेक्षित पावसामुळे तापमानात लक्षणीय घट झाली असून वातावरणात सुखद गारवा निर्माण झाला. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. अनेकांनी या पावसाचा आनंद घेतला, तर काही भागांत पावसामुळे वाहतूक थोड्या वेळासाठी विस्कळीत झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. दरम्यान, हवामान विभागाने पुढील काही दिवसांतही अशाच पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता वर्तवली असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पिंपरी चिंचवडला जगात कोण ओळखतं?

**महानगरपालिका आयुक्तांनी शहराच्या गौरवशाली इतिहासाचा आणि औद्योगिक प्रगतीचा गांभीर्याने अभ्यास करावा - आमदार अमित गोरखे**

पिंपरी (दै. संध्या) :

■ महानगरपालिका आयुक्तांनी शहराचा अपमान करणारी बेजबाबदार विधाने टाळावीत - आमदार अमित गोरखे



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत 'पिंपरी चिंचवडला जगात कोण ओळखतं?' असे केलेले वक्तव्य अत्यंत दुर्दैवी, गैरजबाबदार आणि शहराच्या अस्मितेला धक्का देणारे आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया आमदार अमित गोरखे यांनी व्यक्त केली आहे.

पिंपरी चिंचवड हे केवळ एक शहर नसून, औद्योगिक, सामाजिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या देशाच्या नकाशावर ठळकपणे उमटलेले एक महत्त्वाचे केंद्र आहे. पिंपरी चिंचवड हे शहर जागतिक स्तरावर औद्योगिक प्रगतीसाठी ओळखले जाते. टाटा मोटर्स, मर्सिडीज बेंझ, फोक्सवॅगन, बजाज ऑटो यांसारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या उद्योगसंस्था येथे कार्यरत असून, देशाच्या आर्थिक विकासात मोठे योगदान देत आहेत. इतकेच नव्हे तर, पिंपरी चिंचवड हे संतांची परंपरा आणि सामाजिक चळवळींचे केंद्र राहिले आहे. संत तुकाराम महाराजांची पावन भूमी देहू आणि संत ज्ञानेश्वर महाराजांची आळंदी ही तीर्थक्षेत्रे याच परिसरात आहेत, ज्यामुळे देश-विदेशातून लाखो भाविक येथे येतात. त्यामुळे या शहराची ओळख केवळ औद्योगिक नाही, तर सांस्कृतिक आणि आध्यात्मिक स्तरावरही जागतिक आहे, असे प्रतिपादन देखील आमदार अमित गोरखे यांनी केले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही देशातील सर्वात सक्षम आणि सक्षम प्रशासन देणाऱ्या महानगरपालिकांपैकी एक मानली जाते. स्मार्ट सिटी, पायाभूत सुविधा, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील कामगिरीमुळे या शहराने राष्ट्रीय पातळीवर वेगळी ओळख निर्माण केली आहे. अशा परिस्थितीत आयुक्तांनी केलेले वक्तव्य हे शहराच्या प्रगतीकडे आणि नागरिकांच्या कष्टांकडे दुर्लक्ष करणारे आहे. प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शहराचा इतिहास, सामाजिक-आर्थिक योगदान आणि नागरिकांची भावना समजून घेणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीपूर्ण निर्णयांमुळे पिंपरी चिंचवड शहराला आयटी क्षेत्रात वेगळी ओळख मिळाली असून 'स्मार्ट सिटी'च्या दिशेनेही मोठी झेप घेता आली आहे. याच भक्कम पायावर आज हे शहर राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपली छाप निर्माण करत आहे.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पिंपरी-चिंचवडच्या गौरवशाली इतिहासाचा आणि औद्योगिक प्रगतीचा गांभीर्याने अभ्यास करावा, त्यानंतरच जबाबदारीने विधाने करावीत. शहराची जागतिक ओळख ही कष्टाने निर्माण झाली असून, अशा प्रकारची अनाठायी वक्तव्ये करणे अत्यंत दुर्दैवी आहे. पिंपरी चिंचवड हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर देशाचे अभिमानाचे शहर आहे. त्याची ओळख जगभर आहे, आणि ती अधिक भक्कम करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे काम केले पाहिजे, असेही आमदार अमित गोरखे यांनी यावेळी स्पष्ट केले.

## पाणी बचतीबाबत उन्नती सोशल फाउंडेशनचा पुढाकार



पिंपरी (दै. संध्या) :

पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर अत्यंत सोपा, कमी खर्चिक आणि परिणामकारक असा "फ्लश सेव्ह वॉटर अभियान" हा उपक्रम उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने सुरू करण्यात आला असून, याची सुरुवात पिंपरी-चिंचवड येथील पारस रिवेरा सोसायटीत करण्यात आली आहे. पाणी बचतीबाबत पुढाकार घेऊन सर्व सामान्य नागरिकांमध्ये पाणी वापराबाबत जाणीव जागृती निर्माण करणे हा त्यामागे मुख्य उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत घरातील टॉयलेटच्या फ्लश टँकमध्ये एक लिटर पाण्याने भरलेली प्लास्टिकची बाटली ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यामुळे प्रत्येक फ्लशवेळी साधारण एक लिटर पाणी कमी वापरले जाते आणि मोठ्या प्रमाणावर पाणी बचत साध्य होते. पारस रिवेरा सोसायटीतील ४० फ्लॅट्समध्ये हा उपक्रम राबविण्यात आला आहे. प्रत्येक फ्लॅटमध्ये सरासरी ४ सदस्य आणि प्रत्येक सदस्य दिवसातून किमान ४ वेळा फ्लशचा वापर करतो, असे गृहीत धरल्यास प्रत्येक फ्लशमागे १ लिटर बचत याप्रमाणे दररोज ६४० लिटर पाणी बचत होणार आहे.

## डब्बू आसवानी यांचा वाढदिवस साधेपणाने, सामाजिक बांधिलकी जपत साजरा

पिंपरी (दै. संध्या) :



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील ज्येष्ठ नगरसेवक हिरानंद उर्फ डब्बू आसवाणी यांचा वाढदिवस यंदा अत्यंत साधेपणाने साजरा होत असून, त्यांच्या सामाजिक जाणिवेचा प्रत्यय पुन्हा एकदा शहरवासीयांना आला आहे. दरवर्षी मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात वाढदिवस साजरा करणारे डब्बू आसवाणी यांनी यंदा मात्र वेगळा आदर्श घालून दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी वाढदिवसाचा उत्सव टाळण्याचा निर्णय घेतला आहे. "शुभेच्छा स्वीकारणार आहे, मात्र केक किंवा पुष्पगुच्छ आणू नका. त्याऐवजी गरजू विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य आणावे," असे भावनिक आणि सामाजिक भान जपणारे आवाहन त्यांनी नागरिकांना केले आहे.

"नारळासारखा बाहेरून कडक पण आतून मऊ, आणि नारळाच्या पाण्यासारखा गोड स्वभाव" अशी ओळख असलेल्या आसवाणी यांचा स्वभाव कामाच्या बाबतीत कडक, तर वागण्यात अत्यंत नम्र आणि गोड असल्याचे त्यांच्या सहकाऱ्यांकडून सांगितले जाते. कार्यक्षमतेसोबतच मानवी मूल्यांना प्राधान्य देणारा नेता म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे.

डब्बू आसवाणी यांनी 2007 साली प्रथमच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत निवडून येत राजकारणात प्रवेश केला. त्यानंतर 2012, 2017 आणि आता 2026 मध्येही ते निवडून आले असून, त्यांनी उपमहापौर तसेच स्थायी समिती सभापती यांसारखी महत्त्वाची पदे यशस्वीपणे भूषवली आहेत. सातत्यपूर्ण जनसंपर्क, विकासकामांवरील भर आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन यांच्या जोरावर ते चौथ्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत.

सिंधी समाजातून येणारे आसवाणी यांना पिंपरी परिसरातील व्यापारी वर्गाचा मोठा पाठिंबा लाभला आहे. मात्र, केवळ एका समाजापुरते मर्यादित न राहता सर्व समाजघटकांमध्ये मिसळून काम करण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांची लोकप्रियता अधिक वाढली आहे.

वाढदिवसानिमित्त आज सकाळी त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या जिजामाता रुग्णालयात रुग्णांना फळांचे वाटप करून दिवसाची सुरुवात केली. त्यानंतर ते आपल्या जनसंपर्क कार्यालयात नागरिकांच्या भेटीगाठी घेणार आहेत.

> डब्बू आसवाणी यांच्या या साधेपणाच्या निर्णयाचे आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, समाजासाठी काहीतरी देण्याची प्रेरणा त्यांच्या या कृतीतून मिळत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

## मालमत्ता हस्तांतरण शुल्कवाढीविरोधात प्रशासन धारेवर

पिंपरी (दै. संध्या) :

■ भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांची आक्रमक भूमिका

महापौर रवि लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन



पिंपरी-चिंचवड शहरातील मालमत्ता हस्तांतरण (Property Name Transfer) शुल्कात करण्यात आलेल्या मोठ्या वाढीविरोधात भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न सिताराम काटे यांनी आक्रमक भूमिका घेत थेट महापालिका प्रशासनाला धारेवर धरले आहे. यासंदर्भात त्यांनी डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांना सविस्तर निवेदन सादर करून सध्याचे ०.५% शुल्क तात्काळ रद्द करण्याची मागणी केली. तसेच, महापौर रवि लांडगे यांनाही निवेदन दिले आहे.

शत्रुघ्न काटे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, महापालिकेकडून मालमत्तेच्या एकूण बाजारमूल्यावर ०.५% इतके शुल्क आकारले जात असून, ही आकारणी अत्यंत जास्त व अन्यायकारक आहे. घर खरेदी करताना नागरिकांना आधीच स्टॅम्प ड्युटी आणि नोंदणी शुल्काचा मोठा आर्थिक भार सहन करावा लागतो. त्यात महापालिकेचे हे अतिरिक्त शुल्क म्हणजे सामान्य नागरिकांवर दुहेरी आर्थिक ताण निर्माण करणारे ठरत आहे. "पूर्वी महापालिकेत मालमत्ता हस्तांतरणासाठी केवळ नाममात्र शुल्क आकारले जात होते. ते प्रशासनाच्या खर्चासाठी पुरेसे होते. मात्र आता महसूल वाढवण्यासाठी थेट टक्केवारीवर आधारित शुल्क लावणे ही चुकीची पद्धत आहे," असा ठाम आक्षेप शत्रुघ्न काटे यांनी नोंदवला. याशिवाय, पिंपरी-चिंचवडसारख्या वेगाने विकसित होणाऱ्या शहरात नागरिकांना सुलभ व पारदर्शक सेवा देणे अपेक्षित असताना, अशा जाचक अटींमुळे नागरिक मालमत्ता हस्तांतरणाची नोंद महापालिका दफ्तरी करण्यास टाळाटाळ करत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. यामुळे भविष्यात महापालिकेच्या महसूल संकलनावरही विपरीत परिणाम होऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिला. सध्याच्या वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर घराच्या हस्तांतरणासाठी लाखो रुपयांचे शुल्क भरणे सामान्य कुटुंबांना परवडणारे नाही. त्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणावर नागरिकांमध्ये नाराजी पसरत असून, ही बाब प्रशासनाने गांभीर्याने घेणे आवश्यक असल्याचे काटे यांनी स्पष्ट केले.

> "पिंपरी-चिंचवडमधील सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय करणारे मालमत्ता हस्तांतरणाचे ०.५% शुल्क आम्ही कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही. हे शुल्क तात्काळ रद्द करून पूर्वीप्रमाणे नाममात्र शुल्क लागू व्हावे, यासाठी आम्ही प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा करू. नागरिकांना आर्थिक दिलासा मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहील, आणि आवश्यक असल्यास लोकशाही मार्गाने आंदोलनही उभारले जाईल.
> **– शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.**

मालमत्ता हस्तांतरणासाठी सध्या आकारले जाणारे ०.५% शुल्क तात्काळ रद्द करून, पूर्वीप्रमाणेच नाममात्र (Nominal) शुल्क पुन्हा लागू करावे. यामुळे नागरिकांना आर्थिक दिलासा मिळेल तसेच हस्तांतरण प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि प्रभावी होईल. शेवटी, या जनहिताच्या प्रश्नावर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा शत्रुघ्न काटे यांनी व्यक्त केली आहे.



## भामा-आसखेड जलवाहिनी प्रकल्प त्याच ठेकेदाराला पुन्हा संधी?

पिंपरी (दै. संध्या) :

भामा-आसखेड जलवाहिनी प्रकल्प पुन्हा एकदा चर्चेत आला असून, यापूर्वी वादग्रस्त ठरलेल्या ठेकेदारालाच पुन्हा काम देण्याच्या हालचाली सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या निर्णय प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. गैरव्यवहाराच्या कारणावरून संबंधित ठेकेदाराविरुद्ध कारवाई करण्यात आल्याचे सांगितले जात असताना, त्यालाच पुन्हा संधी देण्याची तयारी सुरू असल्याची बाब नागरिकांमध्ये संभ्रम आणि नाराजी निर्माण करणारी ठरत आहे. एका बाजूला कारवाईची भूमिका आणि दुसऱ्या बाजूला पुनर्नियुक्तीची शक्यता- या विरोधाभासी स्थितीमुळे प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. दरम्यान, या प्रकल्पातील काम काही भागात पूर्ण झाले असले तरी अनेक ठिकाणी काम अपूर्णच असल्याचे दिसून येते. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये असंतोष वाढला असून, कामाच्या दर्जाबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

# "गांधर्व मंचाला जागतिक ओळख.. पण पीसीएमसीला नाही"

**आयुक्त विजय सूर्यवंशी यांचे वादग्रस्त वक्तव्य**

पिंपरी (दै. संध्या) :



गांधर्व मंच संगीत स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्या वक्तव्यामुळे वाद निर्माण झाला आहे. "गांधर्व मंचाला जगभर ओळख आहे; मात्र पीसीएमसीला जगात कोणी ओळखत नाही," असे त्यांनी म्हटल्याने उपस्थित पत्रकारांनी तत्काळ आक्षेप घेत नाराजी व्यक्त केली. जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ आणि अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २ एप्रिल ते ७ जून दरम्यान गांधर्व मंच संगीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या संतपीठ परिसरात होणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त, संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या वैकुंठगमन सोहळ्यानिमित्त तसेच गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या स्थापनेच्या १२५ वर्षांच्या निमित्ताने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. मात्र, कार्यक्रमाची माहिती देताना आयुक्त सूर्यवंशी यांनी केलेल्या या वक्तव्यामुळे वातावरण चांगलेच तापले. शहराच्या प्रतिमेबाबत नकारात्मक भूमिका दर्शविणारे हे विधान असल्याचा आरोप पत्रकारांनी केला. "पिंपरी-चिंचवड हे औद्योगिक व शैक्षणिकदृष्ट्या प्रगत शहर असून, असे वक्तव्य अयोग्य आहे," अशी भूमिका मांडत काही पत्रकारांनी निषेध नोंदवला. दरम्यान, आयुक्तांच्या या वक्तव्यावर विविध स्तरांतून तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# ॲक्सिस मॅक्स लाईफ आणि येस बँककडून २१ वर्षांचा गौरव

## 'डिजिटल- फर्स्ट' भविष्याकडे लक्ष केले केंद्रित

पुणे (दै. संध्या)

ॲक्सिस मॅक्स लाइफ इन्शुरन्स लिमिटेड पूर्वाश्रमीची मॅक्स लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड आणि येस बँक लिमिटेड त्यांच्या धोरणात्मक बँकअश्युरन्स भागीदारीचा २१ वा वर्धापन दिन साजरा केला. दोन दशकांहून अधिक काळ चाललेल्या समन्वयाच्या निमित्ताने या दोन्ही संस्थांनी डिजिटल-फर्स्ट डिलिव्हरी आणि हायपर-पर्सनलाइज्ड प्रोटेक्शन सोल्यूशन्सद्वारे पुढच्या पिढीतील ग्राहकांच्या अनुभवात सुधारणा घडवण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. मागील एकवीस वर्षांत हे सहकार्य उद्योगातील सर्वात यशस्वी सहकार्यांपैकी एक म्हणून विकसित झाले आहे. येस बँकेच्या १३०० पेक्षा जास्त शाखांच्या येस बँकेच्या भारतभरातील नेटवर्कचा लाभ घेत या भागीदारीने सुमारे १८.०३ लाख पॉलिसीधारकांचे भविष्य सुरक्षित करून १.५० लाख कोटीं रूपयांच्या विम्याच्या रकमेचा आकडा पार केला. ॲक्सिस मॅक्स लाइफचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुमित मदन म्हणाले, " येस बँकेबरोबरची आमची २१ वर्षांची भागीदारी ग्राहक प्रथम दृष्टीकोन अधोरेखित करते. भौगोलिक बाबींची पर्वा न करता प्रत्येक नागरिकासाठी आर्थिक सुरक्षा हा एक संघर्षरहित, समृद्ध करणारा अनुभव असल्याची खात्री करण्यासाठी आम्ही प्रत्येक ग्राहक समूहातील जीवाचे रक्षण करण्यासाठी, एआय आणि अखंड डिजिटल एकात्मतेचा वापर करण्यास वचनबद्ध आहोत." येस बँकेचे व्यवस्थापकीय

> आर्थिक संरक्षणाकडे केवळ दुय्यम सेवा म्हणून नव्हे तर भारतातील उदयोन्मुख उद्योजक आणि ग्रामीण कुटुंबांसाठी मूलभूत सक्षमकर्ता म्हणून पाहत, '२०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा' या दृष्टीकोनातून आयआरडीएआयच्या देशव्यापी उपक्रमाला पाठिंबा देण्यासाठी दोन्ही संस्था वचनबद्ध आहेत. ॲक्सिस मॅक्स लाइफ आणि येस बँक प्रत्येक भारतीयांच्या दारापर्यंत संरक्षणाचे कवच आणण्यासाठी, लवचिक आणि आत्मनिर्भर भारताला प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्ध आहेत.

संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत कुमार म्हणाले, येस बँकेच्या डिजिटल पायाभूत सुविधा आणि व्यापक शाखा नेटवर्कच्या माध्यमातून आमच्या ग्राहकांच्या बँकिंग प्रवासात विम्याचे अखंडपणे एकत्रीकरण करण्याची आमची क्षमता ही भागीदारी दर्शवते. ही भागीदारी जसजशी अधिक व्यापक होत जाईल, तसतसा आमचा प्रयत्न भारतीय बाजारपेठेतील निकृष्ट दर्जाच्या विम्याचे लोकशाहीकरण करण्याचा असेल. आम्हाला खात्री आहे की ही युती '२०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा' या राष्ट्रीय दृष्टीकोनाच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल." ही भागीदारी तिसऱ्या दशकात प्रवेश करत असताना या दोन्ही कंपन्यांनी एका मोठ्या राष्ट्रीय मोहिमेकडे लक्ष केंद्रित केले आहे. टियर ३ आणि टियर ४ शहरांमधील संरक्षणाची दरी भरून काढत ही आघाडी एमएसएमई आणि अगदी तळागाळातील जनतेसाठी आर्थिक समावेशकतेला प्राधान्य देत आहे.

# महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ मुंबईचा चौथा दीक्षांत समारंभ संपन्न

## शैक्षणिक गुणवत्ता, परिश्रम आणि यशाचा गौरव

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबईच्या (MNLU Mumbai) शैक्षणिक वाटचालीतील आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा आज नोंदवला गेला. प्रभादेवी, मुंबई येथील ऐतिहासिक रवींद्र नाट्यमंदिरात विद्यापीठाचा चौथा दीक्षांत समारंभ मोठ्या दिमाखात आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सकाळी १० वाजता सुरू झालेल्या या समारंभाला मान्यवर, पदवीधर विद्यार्थी, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थ्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. विधी शिक्षणातील आपला शैक्षणिक प्रवास पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्याचा हा अत्यंत अभिमानाचा आणि संस्मरणीय क्षण ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय गानाने झाली. त्यानंतर महाराष्ट्र राज्यगीत सादर करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण सभागृहात औपचारिकता, गांभीर्य, राष्ट्रभावना आणि प्रादेशिक अभिमान यांचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर MNLU मुंबईचे कुलगुरू प्रा. (डॉ.) दिलीप उके यांनी स्वागतपर भाषणासह विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर केला. आपल्या भाषणात त्यांनी मागील वर्षभरातील विद्यापीठाची शैक्षणिक प्रगती, संशोधन क्षेत्रातील योगदान आणि संस्थात्मक वाढ यांचा सविस्तर आढावा मांडला. या दीक्षांत समारंभाला भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा MNLU मुंबईचे कुलपती मा. श्री. न्यायमूर्ती आलोक अराधे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी दीक्षांत भाषणातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या प्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मा. सौ. न्यायमूर्ती भारती डांगरे, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मा. श्री. न्यायमूर्ती संदीप मारणे, महाराष्ट्र राज्याचे महाधिवक्ता मा. डॉ. मिलिंद साठे, इंडिया इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ लीगल एज्युकेशन अँड रिसर्च (IIULER), गोवा चे कुलगुरू प्रा. (डॉ.) आर. वेंकट राव, प्रा. (डॉ) प्रवीणा खोब्रागडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी विभाग, RTM नागपूर, तसेच MNLU मुंबई चे कुलसचिव मा. प्रा. (डॉ.) श्री. प्रकाश चौधरी हेही मान्यवर उपस्थित होते.

समारंभाच्या औपचारिक उद्‌घाटनाची घोषणा मा. श्री. न्यायमूर्ती आलोक अराधे यांनी केली. त्यानंतर दिवसातील सर्वाधिक प्रतीक्षेत असलेल्या क्षणाला सुरुवात झाली - पदवीधर विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्याच्या सोहळ्याला

पदवी प्रदान सत्रात विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांचा समावेश होता. एकूण २५५ विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. यामध्ये डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (PhD) मधील ३ विद्यार्थी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांतील १३३ विद्यार्थ्यांत एल. एल. एम. एम. ए. मेडिएशन आणि एमबीए या अभ्यासक्रमांचा समावेश होता. तसेच बी. ए. एलएल.बी. (ऑनर्स) या अभ्यासक्रमातील ११९ विद्यार्थ्यांचा समावेश होता.




MNLU मुंबई चे कुलपती मा. श्री. न्यायमूर्ती आलोक अराधे, न्यायाधीश, भारताचे सर्वोच्च न्यायालय यांनी आपल्या दीक्षांत भाषणात न्यायव्यवस्थेतील प्रदीर्घ आणि समृद्ध अनुभवाच्या आधारे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उद्धरणाचा दाखला देऊन म्हणाले की, संविधानिक नैतिकता ही निसर्ग दत्त नसून तिचे रोपण आणि सिंचन करावे लागते. वकील म्हणून केवळ कायद्याचे ज्ञान पुरेसे नसून संवेदनशीलता, प्रामाणिकपणा आणि नीतिमत्ता या मूल्यांनाही तितकेच महत्त्व आहे, असे त्यांनी अधोरेखित केले. समाजाप्रती जबाबदारीची जाणीव ठेवून प्रामाणिकपणे कार्य करणे ही प्रत्येक विधिज्ञाची मूलभूत बांधिलकी असली पाहिजे, असेही ते म्हणाले, शिक्षण विद्यार्थ्यांना विचारशक्ती आणि तर्कशक्ती प्रदान करते; मात्र बाह्यजगतातील अनुभव त्यांच्या व्यावहारिक समज अधिक सक्षम आणि परिपक्व करतात, असा महत्त्वपूर्ण संदेश त्यांनी दिला. तसेच MNLU मुंबई चे कुलगुरू प्रा. (डॉ.) दिलीप उके यांनी आपल्या स्वागतपर भाषणात संस्थेची दृष्टी, मूल्याधिष्ठित शैक्षणिक दृष्टिकोन आणि पदवीधर विद्यार्थ्यांच्या यशस्वी शैक्षणिक प्रवासाचा आढावा घेतला. त्यांच्या भाषणाने विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली. MNLU मुंबईतील विविध संशोधन केंद्रांद्वारे राबविण्यात आलेल्या शैक्षणिक आणि संशोधनपर उपक्रमांचा त्यांनी विशेष उल्लेख केला. तसेच विद्यापीठातील एकूण प्लेसमेंट्समध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे त्यांनी नमूद केले. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या (NALSA) सहकार्याने तयार करण्यात आलेल्या इंटर्नशिप अहवालाच्या प्रकाशनातून त्याचे ठोस प्रतिबिंब दिसून आल्याचेही त्यांनी सांगितले.

> समारोपाच्या सत्रात कुलपतींनी दीक्षांत समारंभ समाप्त झाल्याची औपचारिक घोषणा केली. त्यानंतर राष्ट्रीय गानाने कार्यक्रमाची सांगता झाली. अशा रीतीने शैक्षणिक अभिमान, औपचारिकता, प्रेरणा आणि संस्मरणीय क्षणांनी नटलेला हा समारंभ उपस्थितांच्या मनात दीर्घकाळ कोरला जाईल, अशा वातावरणात संपन्न झाला.

याशिवाय सर्व अभ्यासक्रमांतील गुणवंत विद्यार्थ्यांना पदकेही प्रदान करण्यात आली. अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण परिश्रम, कठोर शैक्षणिक अभ्यास, मूट कोर्टमधील सहभाग आणि विधी संशोधनाच्या बळावर विद्यार्थ्यांनी हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. प्रत्येक विद्यार्थ्याचे नाव पुकारले जाता सभागृहात टाळ्यांचा कडकडाट होत होता आणि त्या क्षणाने समारंभाला विशेष भावनिक उंची प्राप्त झाली.

विविध बॅचमधील शैक्षणिकदृष्ट्या उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आणि विद्यापीठाच्या मूल्यपरंपरेला अर्थपूर्ण योगदान देणाऱ्या पहिल्या तीन गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदके प्रदान करण्यात आली. या गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशातून विधी शिक्षणातील उत्कृष्टतेला चालना देण्याच्या MNLU मुंबईच्या बांधिलकीची प्रभावी प्रचिती आली.

# थोडक्यात पण महत्वाचे...




## विद्यार्थ्यांनी खरेपणाचा ध्यास धरावा - प्रवीण तरडे यांचे आवाहन

पिंपरी (दैनिक संध्या) : दिनांक ३१ मार्च २०२६ : विद्यार्थ्यांनी करिअरच्या वाटचालीत खरेपणाचा ध्यास धरावा असे आवाहन प्रसिद्ध अभिनेते,लेखक,दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी व्यक्त केले. यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स (आयआयएमएस) आणि इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स पुनाजच्या इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेन्ट अँड रिसर्च अर्थात आयबीएमआर यांच्यावतीने आयोजित क्रेसेंडो २०२६ सांस्कृतिक महोत्सवात ते विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बोलत होते.करिअरच्या प्रवासात केवळ सध्या भेडसावणाऱ्या आव्हानांना सामोरे जात असतानाच भविष्यातील संभाव्य घटनांचा वेध घेऊन त्यादृष्टीने आपले व्यक्तिमत्व सज्ज ठेवण्यासाठी प्रयत्नशील व्हायला हवे असेही प्रवीण तरडे यांनी सांगितले. यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या आयआयएमएस आणि इन्स्टिट्यूट ऑफ सांस्कृतिक महोत्सवाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या कार्यक्रमात आयआयएमएस आणि आयबीएमआरच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी वैयक्तिक व सामूहिक पद्धतीने गायन,नृत्य,नाट्य सादरीकरणांचे कलाविष्कार उत्कृष्टरीत्या सादर केले.विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाच्या नियोजनापासून ते अंमलबजावणी पर्यंतची धुरा उत्तम पद्धतीने सांभाळली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयआयएमएसचे संचालक डॉ. शिवाजी मुंढे यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला यशस्वी ग्रुपचे मुख्य मनुष्यबळ व्यवस्थापक श्रीकांत मिरजकर, यशस्वी ग्रुपचे मार्केटिंग विभाग प्रमुख प्रशांत कुलकर्णी यांच्यासह संस्थेचे सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निगडीत भगवान महावीर जयंती साजरी

पिंपरी (दैनिक संध्या) : निगडी प्राधिकरण येथील श्री १००८ महावीर दिगंबर जैन ट्रस्ट च्या वतीने महावीर जन्म कल्याणक महामहोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.सकाळी जलाभिषेक, पंचामृत अभिषेक,शांतिधारा व महाआरती करण्यात आली. प्राधिकरण परिसरातून भव्य शोभा यात्रा काढण्यात आली. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी आचार्य गुलाब भूषण महाराज यांनी आपल्या अमृतवाणीतून प्रवचन दिले. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसेवक अमित गावडे, राजू मिसाळ, शैलजा मोरे, माजी नगरसेवक आर एस कुमार मोरेश्वर भोंडवे, संजोग वाघेरे, ट्रस्टचे अध्यक्ष अजित पाटील, सुदिन खोत, वीरेंद्र जैन शांतीनाथ पाटील, उमेश पाटील धनंजय चिंचवडे, अविनाश भोकरे, प्रकाश शेडबाळे,सुरगोंडा पाटील,वर्धमान पांडे,विजय भिलवडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १०८ जणांनी रक्तदान केले तर २५ जणांनी नेत्रदानाचा संकल्प केला. यावेळी महिलांची कर्करोग निदान तपसणी शिबीर घेण्यात आले. पालखी सोहळ्यात कोल्हापूर येथील झांजपथक, रथ, सुरभी बँड शोभयात्रेचे आकर्षण होते. विरसेवा दल, पार्श्व पद्मावती महिला मंडळाचे सदस्य, भगवान महावीर अहिंसा ट्रस्टचे पदाधिकारी हजारो श्रावक, श्राविका सहभागी झाले होते.

# साई भंडारा व साई पालखी सोहळा उत्साहात संपन्न

डोंबिवली (दै. संध्या)

साई श्रद्धा विविध कार्यकारी सेवा संस्था आणि स्थानिक महिला बचत गटाच्या वतीने गुरुवार दिनांक 26 मार्च 2026 रोजी साई पालखी दर्शन सोहळा आणि साई भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री कैलास सणस आणि पदाधिकारी, सहकारी, कार्यकारणी सदस्य व महिला संघटिका तसेच 40 बचत गटांच्या महिला या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होत्या. कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी स्वरयात्री आर्केस्ट्रा चे आयोजन करण्यात आले होते. बचत गटातील महिला आणि विभागातील नागरिकांनी मंत्रमुग्ध होऊन सुमधुर भक्ती गीतांचा आनंद घेतला. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सौ श्रुती उरणकर मॅडम समाजसेविका या उपस्थित राहिल्या होत्या. त्याचवेळी पालखीचे आगमन झाले, सर्वांनी पालखीचे दर्शन घेत भंडाऱ्याचा तीन हजार नागरिकांनी लाभ घेतला. स्थानिक नगरसेवक संदेश पाटील सौ. रसिका पाटील विकास म्हात्रे सौ. कविता म्हात्रे समाजसेवक बाळा म्हात्रे तसेच शिवसेना पक्षाचे उपजिल्हाप्रमुख योगेंद्र भोईर, शहर प्रमुख प्रकाश तेलगोटे,




विभाग प्रमुख राजेंद्र सावंत व शिवसैनिक कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होते मान्यवरांच्या हस्ते डोंबिवली सन्मान पुरस्कारांचे वितरण करण्यात आले पालखी सोहळ्याचा कार्यक्रम उत्कृष्टपणे पार पाडण्यासाठी अध्यक्ष कैलास सणस कार्याध्यक्ष प्रवीण साळवी सचिव युवराज शेलार खजिनदार मिलिंद काटे कार्यकारणी सदस्य संदेश कदम सचिन उबाळे संदीप उबाळे प्रकाश उबाळे रंजीत खडपकर उदय सावंत संदेश किर्लोस्कर हर्षद करण चौव्हाण संकेत सणस राजीव जाधव विठ्ठल नगाडे यांनी सहकार्य केले त्याचप्रमाणे महिला संघटिका सौ ज्योती उबाळे तृप्ती चव्हाण मंगल पांचाळ नूतन पाटील सोनाली यादव पूजा दुधाळ स्नेहा पांचाळ मयुरी गायकर यांच्यासोबतच महिला बचत गटाच्या अध्यक्ष व अनेक महिला सदस्यांनी वस्तू रुपात तसेच आर्थिक स्वरूपात मदत करून सदर कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात करण्यासाठी सहकार्य केले.

# २६२५व्या जन्म कल्याणक महोत्सवानिमित्त भव्य शोभायात्रा

पुणे (दै. संध्या)

'त्रिशला नंदन वीर की.... जय बोलो महावीर की, जय बोलो महावीर की', 'प्रेम से बोलो जय महावीर' असा जयघोष करीत श्री जैन सामुदायिक उत्सव समितीच्या वतीने आज (दि. ३१) तीर्थंकर भगवान महावीर स्वामीजी यांच्या २६२५व्या जन्म कल्याणक महोत्सवानिमित्त भगवान महावीर यांना अभिवादन करण्यात आले. मंगलवाद्यांच्या सुरात तीर्थंकर भगवान महावीर स्वामीजी यांच्या भव्य प्रतिमेची शोभायात्रा काढण्यात आली.

श्री जैन सामुदायिक उत्सव समिती, पुणेच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या शोभायात्रेस श्री जैन श्वेतांबर मूर्तिपूजक संघ, श्री वर्धमान श्वेतांबर स्थानकवासी जैन श्रावक संघ, श्री जैन श्वेतांबर तेरापंथी सभा, श्री दिगंबर जैन समाज आणि स्थानिक संस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

श्री जैन सामुदायिक उत्सव समिती, पुणेचे अध्यक्ष अचल जैन, कार्याध्यक्ष प्रकाश धारीवाल, महावीर कटारिया, सुधीर शहा, सचिव अनिल गेलडा, संपत जैन, कोषाध्यक्ष समीर जैन, सह कोषाध्यक्ष अल्पेश गोगरी, प्रचार प्रमुख नितीन जैन, सल्लागार सुनिल कटारिया, हरेश शहा, विजयकांत कोठारी, सुधीर शहा, अल्पेश गोगरी, भरत सुराणा, जिनेंद्र



सोन्या मारुती चौकात भगवान महावीर आणि शोभायात्रेच्या अग्रभागी असलेले जैन साधू-साध्वींचे दर्शन आमदार हेमंत रासने, रमेश बागवे, प्रवीण चोरबेले, ॲड. अभय छाजेड, अजय खेडेकर यांच्यासह सामाजिक, राजकीय क्षेत्रातील असंख्य मान्यवरांनी घेतले. भगवान महावीर स्वामीजी यांच्या जन्म कल्याणक महोत्सवानिमित्त दरवर्षी युवकांची दुचाकी रॅली काढण्यात येते. परंतु या वर्षी पेट्रोल टंचाई सदृश्य स्थिती बघता दुचाकी रॅली रद्द करून सामाजिक भान जपल्याचे सांगण्यात आले.

कावेडिया, विनोद सोलंकी, संजय ओस्तवाल, प्रमोद छाजेड, अनिल नहार, प्रविण सोलंकी, सत्यजीत शहा यांच्या मार्गदर्शनाखाली शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ७.३० वाजता गुरुवार पेठेतील श्री गोडीजी पार्श्वनाथ जैन मंदिर येथून भगवान महावीर यांचा जयघोष करीत शोभायात्रेला सुरुवात झाली. आकर्षक फुलांच्या सजावटीने शोभायात्रेतील रथ सजविण्यात आले होते. शोभायात्रेच्या सुरुवातीस भगवान महावीर यांची प्रतिमा असलेला चांदीचा रथ होता. शोभा यात्रेत पुण्यातील जैन मंदिरांचे एकूण २० रथ शोभायात्रेत सहभागी झाले होते. शोभायात्रेत भगवान महावीर यांच्या जीवनावर आधारित विविध आकर्षक देखावे मांडण्यात आले होते. भगवान महावीर यांनी दर्शविलेली जीवनसूत्रे, सिद्धांत जीवंत देखाव्यांद्वारे सादर करण्यात आले. श्री क्षत्रिय घाँची समाज ट्रस्टच्या सदस्यांनी पारंपरिक वाद्यांच्या तालावर फेर धरत भगवान महावीर यांच्या नावाचा जयघोष केला. आत्मसंरक्षणाचे धडे देणारे लाठ्या-काठ्या, दाणपट्टा याची प्रात्यक्षिके लहान मुलांनी सादर केली.

या शोभायात्रेत पारंपरिक सनई-चौघड्याचे वादन तसेच ढोलताशा पथकांचाही सहभाग होता.

जैन बंधू-भगिनी पारंपरिक वेषभूषेत मोठ्या संख्येने शोभायात्रेत सहभागी झाले होते. युवकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता.

शोभायात्रा भांडी आळी, लालबहादूर शास्त्री चौक, बोहरी आळी, सोन्या मारुती मंदिर चौक, गणेश पेठ, गोविंद हवालई चौक, बुरडी पूल, पालखी विठोबा चौक, श्री शंखेश्वर पार्श्वनाथ मंदिर, रामोशी गेट, टिंबर मार्केट, मनमोहन पार्श्वनाथ मंदिर, सेव्हन लव्हज् चौक, अप्सरा चौक, प्रभात प्रेस, कटारिया हायस्कूल, लक्ष्मी विलास, मुकुंदनगर, सुजय गार्डन, शिवशंकर सभागृह, सातारा रोडमार्गे आदिनाथ स्थानक येथे दुपारी पोहोचली. ढोल-ताशाच्या गजरात उत्साहाने आणि भावपूर्णतेने या शोभायात्रेचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले.

# केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांच्या पक्षात प्रवेश

मुंबई (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते प्रा.जीवन जाधव, महिला सरचिटणीस डॉ.रश्मी जीवन जाधव तसेच लॉर्ड बुध्दा इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी निर्माण कृती समितीचे प्रमुख संयोजक डॉ.प्रा.गौतम बेंगाळे यांनी आपल्या समर्थकांसह रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत रिपब्लिकन पक्ष ऑफ इंडिया या

पक्षात प्रवेश केला.रामदास आठवले यांनी त्यांच्या गळ्यात निळा पट्टा घालून त्यांचे स्वागत केले.डॉ प्रा.गौतम बेंगाळे यांनी रामदास आठवले यांचा मानपत्र देऊन त्यांचा सत्कार केला.व शासनाने पुणे येथील पुरंदर तालुक्यातील मौजे घेरा येथे लॉर्ड बुद्धा इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी स्थापन करावी अशी मागणी पत्राद्वारे केली. विक्रोळी कन्नमवार नगरातील विकास हायस्कूल सभागृहात हा पक्ष प्रवेश सोहळा रविवारी दि.२९ मार्च २०२६ रोजी सांयकाळी सहा वाजता मोठ्या उत्साहात पार पडला.या प्रसंगी केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी प्रा. जीवन जाधव हे विचारवंत पॅंथर असून त्यांनी आम्हाला सोडले असले तरी आम्ही त्यांना सोडले नाही.असे सांगितले रिपब्लिकन चळवळीत ज्यांना जे काही शक्य नाही ते सर्व काही मला मिळाले आहे.पदासाठी मी कुठल्याही पक्षात गेलो नाही.सत्तेच्या पदापेक्षा कार्यकर्ता पद महत्वाचे आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा निळा झेंडा गावागावात पोहोचवायचा आहे.अनेक पक्षात लोक जाताना पाहतो आहे. मी तीन वेळा निवडून आलो पण पक्षाच्या चिन्हावर लढलो.काँग्रेस व राष्ट्रवादीचे चिन्ह घेतले नाही.असा दावा रामदास आठवले यांनी केला आहे.रिपब्लिकन ऐक्यासाठी मी नेहमीच आग्रही आहे.अॅड प्रकाश आंबेडकर, प्रा जोगेंद्र कवाडे,गवई यांनी एकत्र यावे ही माझी नेहमीच आग्रही भूमिका राहिलेली आहे.पण रिपब्लिकन ऐक्य होत नाही अशी खंत रामदास आठवले यांनी व्यक्त केली.रिपब्लिकन पक्षात सर्व जाती धर्माचे लोक असून त्यांना निळ्या झेंड्याखाली एकत्र आणावयाचे आहे.सध्याच्या युध्दावर भाष्य करताना ते म्हणाले,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले आहे की,युध्द मला नको,बुध्द हवा आहे.डॉ.रश्मी जीवन जाधव यांनी आपल्या मनोगतातून माझे वडील आरपीआयचे ४५ वर्ष कार्यकर्ते होते.असे सांगून यापुढे निष्ठेने काम करणार असल्याचे सांगून आठवले यांच्यावर कोणी फेसबुकच्या माध्यमातून आक्षेपार्ह पोस्ट टाकल्या तर त्या सहन केल्या जाणार नाही. त्यास जशास तसे उत्तर दिले जाईल असा ईशारा त्यांनी दिला. प्रा.जीवन जाधव यांनी रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पक्षात असताना वेगळ्या ॲम्बिशनसाठी राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षात प्रवेश केला होता. पण पक्ष सोडून गेलो असताना देखील आठवले यांनी पून्हा पक्षात प्रवेश दिला त्याबद्दल आठवले यांचे आभार मानले.मी त्यांची माफी मागतो. पक्षाची बदनामी होईल नाही असे काम करणार नाही. असे ते म्हणाले.आठवले मला गुरुस्थानी आहेत असे सांगताना राष्ट्रवादीत मला शरदचंद्र पवार व सुप्रिया सुळे यांनी काही दिले नाही.मला विधानपरिषदेची आमदारकी काय,या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत माझ्या मुलीला डॉ.रश्मीला साधी उमेदवारी दिली नाही.असा आरोप जीवन जाधव यांनी केला. लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी म्हणतात,आठवले नेहमीच सर्वांना हसवण्याचे काम करतात. रिपब्लिकन ऐक्याची हाक त्यांनी घातली आहे.त्यामुळे तरुणांना आवाहन करताना प्रा.जाधव यांनी तुम्ही सेना,काँग्रेस,राष्ट्रवादीत जाऊ नका गो बॅक आठवले असे ते तळमळीने बोलले.







> या प्रसंगी वकील, डॉक्टर व प्राध्यापक यांनी रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला.त्यामध्ये डॉ.सोनली चव्हाण, सिद्धार्थ सोनावणे,ॲड.मंगला हिरे,डॉ.प्रा. गौतम बेंगाळे,विजय वाघमारे,पुणे आदिंचा समावेश आहे.कार्यक्रमास गौतम सोनावणे,श्रीकांत भालेराव, रमेश गायकवाड, बाळासाहेब गरुड,आशाताई लांडगे,विवेक पवार,ॲड, अनिल मोरे,विनोद जाधव,शीलाताई गांगुर्डे ,सो. ना. कांबळे,उमाताई रामलू, सुभदा चव्हाण,ॲड.अभयाताई सोनावणे,पुणे शहर आरपीआय सचिव दिनकर चंदनशिवे आदि मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सुनिल मोरे,अजित रणदिवे,अशोक घोक्षे,राकेश हिरे यांनी केले होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महापौर मल्लखांब चषक स्पर्धेत शारदा स्पोर्टस् क्लब शारदानगरच्या खेळाडूंचे वर्चस्व

बारामती (दैनिक संध्या) : पुणे येथे दि. 29 व 30 मार्च 2026 रोजी महापौर मल्लखांब स्पर्धा आयोजित करण्यात आली या स्पर्धेत पुणे जिल्हातील एकूण 18 संघांनी सहभाग नोंदवला.यामध्ये 14 वर्षे वयोगट यामध्ये शारदा स्पोर्ट्स क्लबचा मल्लखांबपटू कु.शिवजीत संतोष वळकुंदे याने आपली कसब पणाला लावून अतिशय सुरेख खेळाचे सादरीकरण करत सुवर्ण पदक प्राप्त केले तसेच 12 वर्षे वयोगट यामध्ये वेदांत गाढवे याने रौप्य पदक प्राप्त केले. तसेच सहभागी मल्लखांबपटू मधून उत्कृष्ट सहा मल्लखांब खेळाडूची निवड करण्यात आली यामध्येही यादोन्ही खेळाडूंची निवड झाली. या उत्कृष्ट मल्लखांबपटू मधून कु.शिवजीत संतोष वळकुंदे याने आपला सर्वोत्तम खेळ सादर करून प्रथम क्रमांकसह सर्वोत्कृष्ट मल्लखांबपटू म्हणून बहुमान प्राप्त केला.याप्रसंगी उपस्थित पंच, प्रेक्षक पुणे शहर महापौर यांनी खेळाडूंच्या खेळाचे कौतुक केले.पुणे शहराच्या महापौर सौ.मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते त्यांना पदक व चषक देऊन सन्मानित करण्यात आले त्याचा या यशाबद्दल सर्वस्तरातून त्याचे कौतुक होत असून अॅग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती या संस्थेचे चेअरमन मा. राजेंद्र पवार, विश्वस्त सौ सुनंदा पवार,संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश नलावडे,मानव संसाधन प्रमुख गार्गी दत्ता,समन्वयक प्रशांत तनपुरे,क्रीडा समन्व्यक सचिन शेलार, मुख्याध्यापक सूर्यकांत मुंढे,संतोष वाघ प्रशिक्षक सोमनाथ कोठावळे तसेच शिक्षकवृंद यांनीही या खेळाडूंचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.



### दिव्यांग बांधवांसाठी 5% राखीव निधी अंतर्गत 45 दिव्यांग बांधवांना वाटप

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : लोणीकंद ग्रामपंचायतच्या वतीने दिव्यांग बांधवांसाठी ५% राखीव निधी अंतर्गत एकूण ४५ दिव्यांग बांधवांना प्रत्येकी ३५ हजार रुपयांचे धनादेश वितरित करण्यात आला. हा उपक्रम दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला बळकटी देण्यासाठी महत्त्वाचा ठरला आहे. ग्रामपंचायतीच्या या निर्णयामुळे लाभार्थी दिव्यांग बांधवांना दैनंदिन जीवनात आवश्यक गरजा पूर्ण करण्यास तसेच स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत होणार असल्याचे मत भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदिप कंद यांनी व्यक्त केले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती नारायण कंद, पंचायत समिती सदस्या मोनिका कंद, गट विकास अधिकारी शेलार, विस्तार अधिकारी मोरे, सरपंच सुप्रिया कंद, मा.सरपंच श्रीकांत कंद, उपसरपंच डॉ. सोनाली जगताप, मा. सरपंच गजानन कंद, भैरवनाथ विविध कार्यकारी सोसायटीचे मा. व्हा. चेअरमन गुलाब कंद, ग्रामविकास अधिकारी जालिंदर बोरावणे, ग्रामपंचायत सदस्य, सदस्या,आजी माजी पदाधिकारी व दिव्यांग बांधव, ग्रामस्थ उपस्थित होते.




### धारिवाल जयंतीनिमित्त महारक्तदान शिबीर

■ उत्स्फूर्तपणे सहभाग घेत १७१९ रक्तदात्यांनी केले रक्तदान

शिरूर (दैनिक संध्या) : उद्योगपती स्व.रसिकलाल माणिचंद धारिवाल यांच्या ८७ व्या जयंतीनिमित्त येथील शिरूर नगरपरिषदेच्या मंगल कार्यालयात आयोजीत करण्यात आलेल्या महारक्तदान शिबीरात उत्स्फूर्तपणे तब्बल १७१९ रक्तदात्यांनी सहभाग घेऊन रक्तदान केले.सहभागी रक्तदात्यांमधून लकी ड्रॉ पद्धतीने ८७ जणांना सायकलींचे तसेच प्रत्येक सहभागी रक्तदात्यास आकर्षक ट्रव्हलिंग बॅग भेट देण्यात आली. शिबिराचे उद्घाटन उद्योगपती प्रकाशभाऊ धारिवाल,दिनाभाभी धारिवाल,युवा उद्योजक आदित्य धारिवाल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व स्व.रसिकलाल धारिवाल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून करण्यात आले. स्व. रसिकलाल माणिचंद धारिवाल यांच्या जयंतीनिमित्त पी.आर.धारीवाल फाऊंडेशन व उद्योगपती प्रकाशभाऊ धारिवाल मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबिरास डबल महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर व महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख यांनी भेट दिली. यावेळी नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे,उपनगराध्यक्ष मितेश गादिया,जिल्हा नियोजन समितीचे राहुल पाचर्णे,पंचायत समिती सभापती स्वाती घावटे,जिल्हा परिषद सदस्य सुजाता पवार,जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे,शिरूर शहर विकास आघाडीचे अध्यक्ष सुभाष पवार,माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक रविंद्र ढोबळे,माजी उपनगराध्यक्ष जाकिरखान पठाण,नगरसेवक अभिजीत पाचर्णे, बांधकाम समितीचे सभापती सुनील जाधव,पाणी पुरवठा समितीचे सभापती डॉ.सुनीता पोटे,महिला व बालकल्याण समिती सभापती आयेशा सय्यद,उपसभापती स्वप्नाली जामदार,नियोजन व विकास गृहनिर्माण समिती सभापती स्वाती साठे,स्वच्छता व आरोग्य समिती सभापती एजाज बागवान, उद्योजक विनोद धाडीवाल, प्रवासी संघाचे अनिल बांडे यांसह आजी माजी नगरसेवक नगरसेविका तसेच आयोजक पी.आर. धारीवाल फाऊंडेशन व उद्योगपती प्रकाशभाऊ धारिवाल मित्र मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.केईएम ब्लड बँक,रुबी हॉल ब्लड बँक,अक्षय ब्लड बँक,ओम ब्लड बँक,आनंद त्रुषी ब्लड बँक यांचे सहकार्य लाभले. शिरूर नगरपरिषदेच्या मंगलकार्यालयात आयोजीत शिबीर रविवार दि.२९ रोजी सकाळी सुरू करण्यात आले.रक्तदात्यांनी सकाळपासुनच उत्स्फूर्तपणे रक्तदान शिबीरात सहभाग घेत १७१९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सामाजिक भावनेतून सर्व रक्तदात्यांमधून लकी ड्रॉ पद्धतीने ८७ रक्तदात्यांना सायकल वाटप करण्यात आले तसेच प्रत्येक सहभागी रक्तदात्यास प्रमाणपत्र,एक भेटवस्तू म्हणून बॅग देऊन सन्मानित करण्यात आले. प्रस्ताविक माजी नगरसेवक विजय दुगड यांनी सुत्रसंचालन सुशांत कुटे तर आभार प्रशांत शिंदे यांनी मानले.





# सासवडच्या कावडीतील कऱ्हा जलाभिषेकाने शिखर शिंगणापूर यात्रेची सांगता

## अवघड मुंगी घाट 'हर हर महादेव'च्या जयघोषात सर... वरूणराजाकडून कावडींना जलाभिषेक

सासवड (दै. संध्या)

'हर हर महादेव'च्या जयघोषात श्रीक्षेत्र शिखर शिंगणापूरचा अवघड मुंगी घाट सर करीत मराठी मुलखातील शेकडो कावडींतील पाण्याने मोठ्या महादेवाला जलाभिषेक करण्यात आला. या यात्रेतील प्रथम मानाची समजली जाणारी आणि केवळ मानवी हातांच्या साखळीने अवघड मुंगी घाट सर करणारी सासवड येथील श्री संत भुतोजीबुवा तेली यांच्या कावडीतील पवित्र कऱ्हेच्या पाण्याने सोमवारी शिवलिंगाला अभिषेक (धार घालणे) होऊन या यात्रेची सांगता झाली. यंदा वरुणराजाने जोरदार हजेरी लावत शंभो महादेवाच्या सर्व कावडी आणि शिवभक्तांना जलाभिषेक केला. यामुळे साडेआठच्या सुमारास सासवडची मानाची श्री संत भुतोजीबुवा तेली यांची कावड घाटावर पोहोचली.

चैत्र शुद्ध बारसेला श्री क्षेत्र शिंगणापूर येथे लाखो शिवभक्तांच्या उपस्थितीत महादेवाला पाण्याची धार घालण्यासाठी शेकडो वर्षांपासून मराठी मुलखातील ७०० ते ८०० कावडी दरवर्षी येत असतात. यामध्ये श्रीक्षेत्र शिखर शिंगणापूर महादेवाचे परमभक्त सासवडच्या भूतोजीबुवा तेली यांचा प्रथम मान आहे. सातारचे छत्रपती श्रीमंत आबासाहेब महाराज यांनी २३ शेर वजनाचे १२ हंडे पाणी मावतील असे शुद्ध तांब्याचे दोन रांजण वाहिलेले आहेत. मोढवे (ता. बारामती) येथे पुरंदरे, फलटणमध्ये नाईक निंबाळकर घराण्यातील प्रतिनिधी कावडीची पूजा करतात. तर शिखर शिंगणापूर येथे छत्रपती शिवरायांचे वंशज सातारचे राजमाता कल्पनाराजे भोसले व खासदार छत्रपती उदयनमहाराज भोसले यांच्या वतीने विधिवत पूजा, कावडीच्या भुतोजी बुवा तेली यांना मानाचा विडा व दक्षिणा दिली जाते. तसेच राजघराण्यामार्फत कावडीस भगवे निशाण व ३५ हात ध्वजाचे जरी-पागोटे दिले जाते. हा मान शिवकाळापासून चालत आला असून आजतागायत ही परंपरा चालू आहे.

दरम्यान, रामनवमीला रात्री उशिरा कावडीने सासवडहून शिखर शिंगणापूर यात्रेसाठी प्रस्थान ठेवले. जेजुरी, कोळविहीरे, मोढवे, वाकी, वडगाव, जिंती, फलटण, विडणी, आंदरुड, कोथळे आणि मुंगी घाट मार्गे शिखर शिंगणापूर असा प्रवास झाला. सोमवारी दुपारी चार वाजता कोथळे येथील बारसीच्या ओढ्यात तेल्या भुत्याच्या सासवड आणि कोथळेच्या कावडीच्या भेटीचा सोहळा झाला. त्यानंतर साडेपाच वाजता घाटाच्या पायथ्याला आरती होऊन हजारो शिवभक्तांसह कावडीने मुंगी घाट चढण्यास सुरुवात केली. यावेळी माजी आमदार संजय जगताप, कैलासबुवा कावडे, सासवडचे पाटील संग्राम जगताप, कावड मंडळाचे अध्यक्ष संजय द. जगताप, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप यांसह सासवड व पंचक्रोशीतील हजारो शिवभक्त उपस्थित होते. घाटाचे अवघड तीन टप्पे केवळ मानवी हातांच्या साखळीने सर केले. हा सोहळा पाहण्यासाठी घाटावर लाखो भाविकांनी गर्दी केली होती. सायंकाळी ठिक साडेसात वाजता घाटावर आली. यावेळी विविध वाद्यांच्या सुरावटीत, टाळ्यांच्या कडकडाटात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत आणि लाखो भाविकांच्या शिवनामाच्या गजरात या मानाच्या कावडीचे स्वागत झाले.

मुंगी घाटाने कावड शिवालयाजवळ पोहोचल्यावर सातारचे श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या राजघराण्यामार्फत कावडीची विधिवत पूजा होऊन भुतोजी बुवा तेली यांना मानाचा विडा व दक्षिणा तसेच कावडीस भगवे निशाण व ३५ हात ध्वजाचे जरी-पागोटे देण्यात आले. मंदिरातील चावडीवर बाजा म्हणजेच वाद्यकाम झाले. यावेळी सासवडच्या मानकरी भोंडे मंडळींचे बाजकाम पाहण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. देवस्थान कमिटीच्या वतीने बाजकाम करणाऱ्यांना मानाचा विडा व दक्षिणा देण्यात आली. यानंतर कावडीच्या भेटी होऊन सासवड आणि खळदच्या भुतोजी बुवा तेली यांनी आणलेल्या कऱ्हेच्या पाण्याने मुख्य शिवलिंगास जलाअभिषेक होऊन यात्रेची सांगता झाली. सासवडचे पाटील संग्राम जगताप, कावडीचे भुतोजी कैलासबुवा कावडे, कावड मंडळाचे सदस्य आणि सासवडसह परिसरातील हजारो शिवभक्तांनी कावड पायी सोहळ्याचे काम पाहिले.

## आपला हिंदू धर्म श्रद्धा आणि अंधश्रद्धेच्या एका निसरड्या पातळीवर

■ शर्मिष्ठा उत्पात-ताशी यांचे मत : श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने व्याख्यान

पुणे (दै. संध्या)

आपला हिंदू धर्म श्रद्धा आणि अंधश्रद्धेच्या एका निसरड्या पातळीवर आहे. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक न कळल्यामुळे आपला धर्म वेगळ्या वाटेवर जात आहे, याची उदाहरणे आपण रोज ऐकत आहोत. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक कळला पाहिजे. श्रद्धेच्या नावाखाली कोणत्याही गोष्टीला बळी न पडता आपण सजग राहून डोळस श्रद्धा ठेवली पाहिजे. जेव्हा ज्ञानेंद्रिये जागृत करून तुम्ही परमेश्वराची भक्ती कराल, तेव्हा जीवनाचा भवसागर पार करू शकाल. कलियुगात परमेश्वराच्या नामस्मरणाने आपण तरणार आहोत, असे मत व्याख्यात्या शर्मिष्ठा उत्पात-ताशी यांनी व्यक्त केले. श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने 'सद्गुरु श्री जंगली महाराज १३६ वा पुण्यतिथी उत्सव' साजरा करण्यात येत आहे. या उत्सवात शर्मिष्ठा उत्पात-ताशी यांचे 'अलौकिक पंढरपूर' या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी पंढरपूर कसे पाहिले पाहिजे, रुक्मिणी आणि पांडुरंगाच्या मूर्तीचे महात्म्य नेमके काय आहे, पांडुरंगाच्या मूर्तीवरील मुक्तकेशीची उमटलेली बोटे, पांडुरंगाची दिनचर्या आदी विषयांवर श्रोत्यांना मार्गदर्शन केले. शर्मिष्ठा उत्पात-ताशी म्हणाल्या, परमेश्वर कोणतेही कर्मकांड सांगत नाही. त्याला केवळ भक्तीची ओढ असते. ती भक्ती तुम्ही परमेश्वराच्या नामस्मरणातून करा. मुखी परमेश्वराचे नाम आणि मनी भाव असला की तुम्ही परमेश्वराच्या चरणी लीन होता. तुम्ही एकदा पंढरपूरच्या वारीला गेलात, तर तुम्हाला पांडुरंगाची ओढ कायम राहील, असेही त्यांनी सांगितले.

## महसूल विभागाची धडक कारवाई; गुन्हे दाखल

उरुळी कांचन (दै. संध्या) : पूर्व हवेलीत माती मिश्रीत वाळू धुणाऱ्या दोन ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे.यांमुळे वाळू वॉशिंग सेंटर चालकांचे धाबे दणाणले आहे. अपर लोणी काळभोर या कार्यक्षेत्रामध्ये गेले काही दिवस अनाधिकृत माती मिश्रित वाळूचा उपसा व वाहतूक केल्याच्या अनेक तक्रारी महसूल प्रशासनाला प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार जिल्हाधिकारी पुणे आणि उपविभागीय अधिकारी हवेली यांच्या सूचनांनुसार अप्पर तहसील कार्यालय लोणी काळभोर यांच्यामार्फत कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये सोरतापवाडी येथे अनाधिकृतपणे माती मिश्रित वाळू धुण्याच्या २ ठिकाणी धडक कारवाई करण्यात आली आणि सदर जागा मालकांवर लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या ठिकाणी वाळू धुण्यासाठी बांधलेला रॅम्प तसेच माती मिश्रित वाळू धुतल्यानंतर शिल्लक राहिलेली माती आणि पाणी आढळून आले.

## गायिका सौ. मृदुला दाढे यांच्या सुश्राव्य गीतांचा कार्यक्रम


पुणे (दै. संध्या)




भारतीय मजदूर संघाशी संलग्न आलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉईज ऑर्गनायझेशनच्या महिला विभागातर्फे पुण्यात डॉ मृदुला दाढे यांचा 'तरी असेल गीत हे' हा सुश्राव्य गीतांचा एक अतिशय अविस्मरणीय कार्यक्रम रविवार २९ मार्च रोजी कमिन्स महाविद्यालयातील सभागृहात संपन्न झाला. बँक ऑफ महाराष्ट्र निवृत्त संघटनेचा महिला विभाग महिला दिनाच्या निमित्ताने महिला सदस्यांसाठी दरवर्षी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करीत असतात.त्यातला हा एक कार्यक्रम. कमिन्स कॉलेजच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात मृदुला दाढे यांनी,दिग्गज संगीतकारांचे समृद्ध संगीत लाभलेल्या जुन्या मराठी - हिंदी गाण्यांतील शब्दांचे भाव - विभ्रम आपल्या गोड गळ्यातून उमटवत सुमारे दोन तास रसिकांना मंत्रमुग्ध केले. 'ॐ नमोजी आद्या' ह्या संत ज्ञानेश्वरांच्या व पं. हृदयनाथ मंगेशकरांनी संगीतबध्द केलेल्या मंगलाचरणाने कार्यक्रम सुरू झाला. त्यानंतर "तिन्हिसांजा सखे मिळाल्या", "जीवलगा कधी रे येशील तू", 'ही वाट दूर जाते", "सांग तू माझा होशील का" आणि हिंदीतील - "अब तो है तुमसे हर खुशी अपनी", "पिया तोसे नैना लागे रे", "दिलका भँवर करे पुकार" इत्यादी गाणी सुरेख रित्या रसिकांसमोर सादर केली. शेवटी सर्व श्रोत्यांच्या सहभागाने 'अभी ना जाओ छोडकर' ह्या गाण्याने सुरेल मैफिलीची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी बँक ऑफ महाराष्ट्र निवृत्त कर्मचारी संघटनेच्या निवृत्त महिला सदस्यांची लक्षणीय उपस्थिती होती. बँक ऑफ महाराष्ट्र निवृत्त संघटनेच्या उपाध्यक्षा सानिका खोपकर यांनी प्रास्ताविक भाषण केले. मनीषा साने आणि वीणा इतराज यांनी प्रसिद्ध गायिका डॉ मृदुला दाढे यांचे शाल ,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत आणि सत्कार केला. त्यानंतर ज्योती गोळे यांनी डॉ . मृदुला दाढे यांचा परिचय करून दिला.लता राव यांनी कार्यक्रमाचा आभार प्रदर्शनाने समारोप केला.

# ऑनलाईन प्रक्रियेचा बोजवारा; संकेतस्थळ ठप्प, कर्जदारांचे हाल

नीरा (दै. संध्या)



शासकीय कर्ज योजनांसाठी आवश्यक असलेले 'उद्यम नोंदणी' आणि 'आधार' संबंधित ऑनलाईन प्रणाली गेल्या दोन आठवडाभरापासून ठप्प असल्याने कर्जदार आणि लघुउद्योजक अडचणीत सापडले आहेत. दुरुस्त्या न होणे, कागदपत्र अपलोडमध्ये अडथळे आणि बँकांच्या फेऱ्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

राज्य व केंद्र शासनाकडून युवक आणि लघुउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध कर्ज योजना राबवल्या जात आहेत. मात्र या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली 'उद्यम नोंदणी' आणि आधार प्रणाली गेल्या पंधरा दिवसांपासून जिल्ह्यात व्यवस्थित कार्यरत नसल्याचे समोर आले आहे. यामुळे नवीन अर्जदारांबरोबरच जुन्या प्रकरणांमध्ये दुरुस्ती करायची असलेल्या लाभार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

कर्ज प्रकरणासाठी अर्ज करताना आधार, पॅन कार्ड, उद्योग आधार यांसारखी कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक असते. मात्र सध्या सुरू असलेल्या सॉफ्टवेअरमध्ये अगदी नावातील लहान-मोठ्या अक्षरांतील फरक (स्मॉल-केपिटल) असला तरी अर्ज स्वीकारला जात नाही. परिणामी, अर्जदारांना दोन-दोन दिवस बँकेत थांबूनही प्रक्रिया पूर्ण करता येत नाही.

दरम्यान, मराठा समाजासाठी कर्जपुरवठा करणाऱ्या 'अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळा'च्या योजनांमध्येही अडचणी निर्माण झाल्या आहेत. ३० ते ५० लाख रुपयांच्या कर्जासाठी आवश्यक असलेली एल. ओ. आय (LOI) प्रक्रिया आर २ ('R2') प्रणालीमध्ये नोंद होत नसल्याने अर्ज प्रलंबित राहत आहेत. संबंधित संकेतस्थळ देखील दीर्घकाळापासून बंद असल्याची तक्रार आहे.

यासंदर्भात कस्टमर केअरशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता फोनला प्रतिसाद मिळत नसल्याचे सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे यांनी बोलताना सांगितले. तर दुसरीकडे, बँक अधिकारी ग्राहकांना सहकार्य करण्याचा प्रयत्न करत असले तरी पूर्ण प्रक्रिया ऑनलाईन असल्याने त्यांच्याही हातात काहीच राहत नाही.

या सर्व प्रकारामुळे कर्जदारांना वारंवार बँकांच्या फेऱ्या माराव्या लागत असून वेळ आणि आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. शासनाने तातडीने या तांत्रिक अडचणी दूर करून प्रणाली सुरळीत करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत असल्याची माहिती सचिन मोरे यांनी दिली.

राज्यातील विविध आर्थिक विकास महामंडळांच्या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात विसंगती असून लाभार्थ्यांना प्रत्यक्ष मदत मिळत नसल्याचा आरोप प्रहार जनशक्ती पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष मंगेश ढमाळ यांनी केला. अण्णासाहेब पाटील महामंडळात व्याज परतावा मिळत नाही, अर्ज विनाकारण नाकारले जातात; ओबीसी (OBC) महामंडळात मंजुरीला विलंब होत आहे. वसंतराव नाईक व संत रोहिदास महामंडळात जाहीर कर्जापेक्षा कमी रक्कम दिली जाते, तर परशुराम महामंडळातून अद्याप कर्जवाटपच झालेले नाही. शासनाने तात्काळ चौकशी करून न्याय द्यावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष मंगेश ढमाळ यांच्यकडून देण्यात आला आहे.